CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि.२८ एप्रिल २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २०९ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## राजस्थानकडून चेन्नईचा ३२ धावांनी पराभव

**हैदराबाद :** अ‍ॅडम झम्पा आणि आर. अश्विन यांच्या फिरकीच्या जोरावर राजस्थानने चेन्नईचा ३२ धावांनी पराभव केला. शिवम दुबे याने वादळी अर्धशतकी खेळी केली. पण संघाला विजय मिळवून देण्यास अपयश आले. राजस्थानने दिलेल्या २०२ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना चेन्नईने सहा विकेटच्या मोबदल्यात १७० धावांपर्यंत मजल मारली. चेन्नईच्या पाच विकेट फिरकी गोलंदाजांनी घेतल्या. या विजयासह राजस्थान रॉयल्सने गुणतालिकेत पहिल्या क्रमांकावर झेप घेतली आहे. चेन्नईचा संघ तिसऱ्या स्थानावर घसरलाय. राजस्थान रॉयल्सचा आज २०० वा आयपीएल सामना होता. राजस्थान रॉयल्सने दिलेल्या २०३ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना पावरप्लेमध्ये मोठी धावसंख्या उभरता आली नाही, हे पराभवाचं एक कारण असल्याचे सामन्यानंतर धोनीने सांगितले.

**आयपीएल सामना क्र.३८**

PUNJAB KINGS Vs LUCKNOW SUPER GIANTS

पंजाब किंग्ज विरुद्ध लखनौ सुपरजाएंट्स्

वेळ : सायं.७.३० वा.

स्थळ : बिंद्रा स्टेडियम, मोहाली

# ‘सिध्देश्वर’ची चिमणी, पाडता की पाडू?

## महापालिकेने दिली कारखान्याला नोटीस

सुराज्य/सोलापूर

**संपूर्ण शहर आणि जिल्ह्याचे लक्ष वेधलेल्या कुमठे येथील सिद्धेश्वर साखर कारखान्याची चिमणी अखेर महापालिकेने अनधिकृत ठरवली आहे. ४५ दिवसात चिमणीचे बेकायदेशीर बांधकाम काढून घ्यावे, न काढल्यास सोलापूर महापालिकेच्या वतीने बांधकाम पाडण्यात येईल, त्याचा संपूर्ण खर्च सिध्देश्वर कारखान्याकडून वसूल करण्यात येईल अशी, नोटीस सिध्देश्वर कारखान्यास गुरुवारी पाठवण्यात आल्याची माहिती महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी दिली.**



सोलापूर विमानसेवेस अडचण ठरणाऱ्या सिध्देश्वर साखर कारखान्याच्या चिमणी संदर्भात उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे महापालिकेचे आयुक्त शीतल तेली-उगले यांनी ४ महिन्यांपूर्वी सुनावणी घेतली होती. सुनावणीनंतर निकाल राखून ठेवला होता. त्या निकालाची सर्वांना उत्सुकता होती. दरम्यान, पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी कारखान्याचा गाळप हंगाम संपल्यानंतर पालिका योग्य तो आदेश देईल, असे सूचित केले होते. त्यानुसार महापालिका आयुक्तांनी सिध्देश्वर साखर कारखान्याच्या चिमणीचे बांधकाम अनधिकृत ठरवले आहे. विमानसेवेस अडथळा ठरणारी श्री सिध्देश्वर साखर कारखान्याच्या ९१.१० मीटर उंच असलेल्या चिमणीचे बांधकाम अनधिकृत आहे. हे अनधिकृत बांधकाम तातडीने काढून घ्यावे, यासाठी महापालिकेच्या वतीने नोटीस बजावण्यात आली आहे. येत्या ४५ दिवसात चिमणीचे बेकायदेशीर बांधकाम न काढल्यास महापालिकेच्या वतीने ती चिमणी पाडण्यात येईल व त्याचा संपूर्ण खर्च सिध्देश्वर साखर कारखान्याकडून वसूल करण्यात येईल, असेही आयुक्त शीतल तेली -उगले यांनी सांगितले.

दरम्यान, चिमणी काढण्यात यावी यासाठी सोलापूर विकास मंचने नियमितपणे पाठपुरावा केला होता. वेळेवर महापालिका आयुक्तांनी निकाल द्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे त्यांनी केली होती. अखेर आयुक्तांनी चिमणी संदर्भात निकाल दिला आहे. यापूर्वी २०१७ मध्ये तत्कालीन प्रभारी आयुक्त राजेंद्र भोसले यांनीही चिमणी पाडण्याचे आदेश दिले होते. या प्रकरणी चिमणी पाडकामासाठी त्यांनी टेंडरही काढले होते. नाशिक येथील विहान कन्स्ट्रक्शन कंपनीने चिमणीचे पाडकाम करण्याची तयारी दर्शवली आहे. जर साखर कारखान्याने स्वतःहून चिमणी पाडली नाही तर विहान कन्स्ट्रक्शन मार्फतच चिमणी पाडकामाचे टेंडर होईल, असे पालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी स्पष्ट केले.

### सध्यातरी चिमणीला ४५ दिवसांचे अभय

महापालिकेच्या वतीने आत्तापर्यंत दोनवेळा चिमणी पाडकामाचे आदेश दिले आहेत. मात्र सिध्देश्वर कारखान्याने कायद्यातून पळवाटा काढत या चिमणीचा बचाव केल्याचे दिसून आले आहे. पुन्हा ४५ दिवसात चिमणी पाडकामाचे आदेश दिले आहेत. त्यामुळे चिमणीला ४५ दिवसांचे अभय दिल्याचे बोलले जात आहे. यापूर्वी राजेंद्र भोसले यांनी केवळ ८ दिवसात चिमणी पाडकामाचे आदेश दिले होते. आता कारखाना यापुढे काय भूमिका घेतो याकडे सर्वांचेच लक्ष लागून राहिले आहे.



### माहिती घेऊन बोलणार

महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी बजावलेल्या नोटिसीबाबत अद्याप मला माहिती नाही. यासंदर्भात माहिती घेऊन, सविस्तर उत्तर देईन.

**- धर्मराज काडादी**

माजी चेअरमन, श्री सिध्देश्वर कारखाना

### पूर्वी शेतकऱ्यांनी केला होता विरोध

चिमणी पाडकामास तत्कालीन पालिका आयुक्त शिवशंकर यांच्या काळात सुरुवात करण्यात आली होती. मात्र त्यावेळी साखर कारखान्याच्या वतीने मोठे आंदोलन करण्यात आले होते. चिमणी पाडकामास गेलेल्या अधिकाऱ्यांनाही मारहाण करण्यात आली होती. काही शेतकऱ्यांनी चिमणीवर चढून पाडकामास विरोध केला होता. त्यामुळे चिमणी पाडकाम त्यावेळेस थांबले होते. आता या निर्णयानंतरही हे प्रकरण पेटण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

### कारखान्याचे असे आहे म्हणणे

एनटीपीसीची चिमणी कारखान्याच्या चिमणीपेक्षा उंच आहे. तरीही त्यांना परवानगी मिळाली. त्याचपध्दतीने कारखान्यालाही परवानगी द्यावी, विमान प्राधिकरणाकडून सर्व्हे केला होता. चिमणी अडथळ्याची ठरत असेल तर रीतसर कारखान्याला सर्व्हेचा अहवाल देणे अपेक्षित होते, तो कारखान्याला दिला गेला नाही. होटगीरोड विमानतळ छोटे आहे, त्यामुळे नव्याने बोरामणी विमानतळ उभारण्यात येत आहे. पर्यायी मार्ग उपलब्ध असताना नाहक या कारखान्यावर अवलंबून असलेल्या हजारो कर्मचाऱ्यांवर बेरोजगारीचे संकट कशासाठी? असे कारखान्याचे म्हणणे आहे.

### आयुक्तांनी काढले चुकीचे आदेश : विकास मंच

चिमणी पाडकामाविषयी पालिका आयुक्तांनी तब्बल ४ महिन्यानंतर घेतलेला निर्णय अत्यंत चुकीचा आहे. सन २०१७ साली हीच सर्व प्रक्रिया पार पाडून देखील प्रशासन चिमणी पाडू शकले नाही. त्यावेळी कारखाना अध्यक्षांनी सन २०१७ चे गाळप संपल्यावर स्वतःहून चिमणी पाडण्याबाबत लेखी दिले होते. तत्कालीन जिल्हाधिकारी व आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी त्यावर विश्वास ठेवला. तीच चूक आता पालिका आयुक्तांनी पुन्हा केली आहे. या निर्णयावर चर्चा करण्यासाठी शुक्रवारी सोलापूर विकास मंचची तातडीची बैठक शासकीय विश्रामगृहात आयोजित केल्याचे विकास मंच सदस्य केतन शहा यांनी सांगितले.

### आयुक्तांनी करून दाखवलेच

चिमणीचा निर्णय देण्याचा अधिकार महापालिका आयुक्तांना नाही, असे धर्मराज काडादी यांचे म्हणणे होते. मात्र मीच ऑर्डर क्लोज केली, मीच निर्णय देणार असे आयुक्त उगले ठामपणे सांगत होत्या. अखरे आयुक्तांनी चिमडी पाडण्याचा निर्णय देत करूनच दाखवले अशी चर्चा महापालिका वर्तुळात होती.

## ढवळस स्टेशनवर रेल्वे सिग्नल कट करून जबरी चोरीचा प्रयत्न फसला



सुराज्य/कुर्डूवाडी

ढवळस (ता. माढा) येथील रेल्वे स्टेशनवरील होम सिग्नल कट केल्यामुळे एकतानगर-चेन्नई एक्सप्रेस थांबल्याने अज्ञात चोरट्याने खिडकीवर चढून महिलेच्या गळ्यातील दागिने ओढून जबरी चोरी तसेच दगडफेक करून प्रवाशांना जखमी करण्याचा प्रयत्न प्रवाशांच्या सतर्कतेमुळे फसला. ही घटना दि.२७ रोजी रात्री ११.३०च्या सुमारास ढवळस (ता.माढा) रेल्वे स्थानकावरील होम सिग्नलवर घडली. कुर्डूवाडी रेल्वे पोलीस ठाण्यात प्रवाशांनी फिर्याद दाखल केली आहे.

गुजरातच्या एकतानगरहून चेन्नई सेंट्रलकडे निघालेल्या गाडी (नंबर २०९२०) मधून शाकिरा शेख या दि.२६ रोजी बोगी नं. एस ४ मधून बर्थ क्र. ३१ वरून झोपून प्रवास करत होत्या. ढवळस रेल्वे स्थानकाच्या होमसिग्नलजवळ अज्ञात दोन चोरट्यांनी सिग्नल कट करून गाडी थांबवून बोगी नं. एस ४ मधील शाकिरा शेख यांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने जबरीने ओढून नेण्याचा प्रयत्न केला.तसेच सहप्रवासी मनीषा प्रमोद चौधरी (रा. वापी ता.पारडी, गुजरात) यांना गाडीच्या बाहेरून खिडकीतून दगड मारून जखमी करण्याचा प्रयत्न केला. याबाबत शेख यांच्या फिर्यादीवरून अज्ञात दोन चोरट्यांविरुध्द कुर्डूवाडी लोहमार्ग पोलिसांत दि.२७ रोजी गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास लोहमार्गच्या पो.नि.संगीता हत्ती करीत आहेत.

### प्रवाशांनी खिडक्या उघड्या ठेवू नये

रेल्वेत चोरी सारखे गुन्हे होऊ नयेत म्हणून रेल्वे स्थानक व परिसरात रेल्वे पोलीस व आर.पी.एफ. जवानांचे बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. मात्र प्रवाशांनीही तेवढे सतर्क राहणे गरजेचे आहे. रेल्वे प्रवासादरम्यान रात्रीच्यावेळी प्रवासी खिडक्या व दरवाजे उघडे ठेवून बसलेले असतात. यामुळे गाडी थांबल्यानंतर चोरट्यांना संधी मिळते. तरी प्रवाशांनी गाडी फ्लॅट फॉर्म शिवाय इतर ठिकाणी थांबल्यानंतर व ट्रेनचा वेग कमी झालेला असताना खिडक्या व दरवाजे उघडे ठेवू नये. असे आवाहन रेल्वे पोलीस निरीक्षक संगीता हत्ती यांनी केले आहे.



## खर्ग डोहात बुडून बालकाचा मृत्यू

**मोहोळ :** मोहोळ येथे खर्ग डोहात बुडून मुलाचा मृत्यू झाल्याची घटना २६ एप्रिल रोजी घडली. प्रिन्स कुमार रवींद्र यादव (वय १४) असे त्या मुलाचे नाव आहे. प्रिन्स कुमार हा मोहोळची यात्रा सुरू असल्याने यात्रेमध्ये आपल्या चुलत भावासोबत फिरण्यासाठी गेला होता.



हे घरातून दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास यात्रेमध्ये गेले होते. यात्रेमध्ये फिरत असताना चार वाजण्याच्या सुमारास त्यांची यात्रेच्या गर्दीमध्येच चुकामूक झाली. प्रिन्स घरीही पोहोचला नव्हता म्हणून त्याचा शोध घेण्यास सुरुवात केली. यात्रेमध्ये गुरु शिष्य भेटीचा सोहळा असतो यादरम्यान यात्रेला आलेली मुलेही या खर्ग डोहामध्ये पोहण्याचा आनंद लुटत असतात प्रिन्सकुमार यात्रेमध्ये पोहण्यासाठी गेला होता परंतु तो डोहातून बाहेर आलाच नव्हता. पिवळा शर्ट घातलेला मुलगा पाण्यामध्ये गेला परंतु तो बाहेर आलाच नाही म्हणून बाजूचे लोक सांगत होते. पाण्यामध्ये शोधाशोध केली असता पाण्यात गाळातून प्रिन्स कुमार रात्री नऊ वाजण्याच्या दरम्यान सापडला. त्याचा पाण्यामध्ये बुडून मृत्यू झाला होता. याबाबत मोहळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

## वादळात झोळी उडून दगडावर आपटली; जवळा येथे दोन वर्षाच्या मुलीचा मृत्यू

सुराज्य/सांगोला



जवळा येथे वादळात झोपडीतील झोळी २० वीस फूट आकाशात उडून दगडावर आपटल्याने झोळीतील दोन वर्षाच्या मुलीचा मृत्यू झाल्याची दुर्दवी घटना गुरुवार दि. २७ एप्रिल रोजी दुपारी तीनच्या सुमारास घडली.

साधू अण्णाप्पा चव्हाण हा सांगोला तालुक्यातील सोनंद येते पत्नी अनिता व दोन मुले दोन मुली यांच्या सह रहात आहे तेथे ते मोलमजुरी करून आपली उपजीविका करून जीवन जगत होते. पत्नी आजारी असल्याने ती आपल्या वडिलांच्या जवळा या गावी उपचारासाठी दोन वर्षाची कस्तुरी सह गेली होती. वडिलांच्या झोपडीच्या घरात नातेवाईकांच्या सोबत झोळीत झोपवून अनिता ही जवळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात वडील वामन निंबाळकर यांच्याबरोबर गेली होती. गुरुवारी दुपारी तीनच्या सुमारास मोठी वावटळ आल्याने झोपडी सह झोळीतील कस्तुरी ही वीस फूट आकाशात वर उडाली. नंतर खाली दगडावर आपटली. त्यामध्ये ती गंभीर जखमी झाली तिला त्वरित सांगोला येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता उपचारापूर्वीच ती मयत झाली. सांगोला पोलीस स्टेशन मध्ये साधू अण्णाप्पा चव्हाण (वय ३०) याने फिर्याद दाखल केली असून पुढील तपास सांगोला पोलीस करीत आहे.

## भोईजे येथे दोन गटात तलवार आणि कोयत्याने मारहाण

**५ तरुण जखमी, ८ जणांविरुद्ध गुन्हा**


**बार्शी :** तालुक्यातील भोईजे येथे जाधव आणि डांगरे यांच्या गटात किरकोळ कारणावरून तलवार, कोयता, लोखंडी गज आणि काठीने झालेल्या मारहाणीत महिलेसह पाच जण जखमी झाले. ही घटना काल बुधवारी सकाळी घडली.

या प्रकरणात बार्शी तालुक्याच्या पोलिसांनी परस्परविरोधी फिर्याद नोंदवून ८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. यासंदर्भात आनंद भगवान जाधव (वय २३ रा .भोईजे) याने दिलेल्या फिर्यादीवरून विठ्ठल डांगरे त्याची आई अनुसया डांगरे आणि प्रकाश मुळे या तिघांना विरुद्ध गुन्हा दाखल झाला. फिर्यादीच्या चुलत भावो शिवीगाळ केल्याच्या जाब विचारण्यासाठी आरोपीच्या वस्तीवर गेले असता तिघांनी मिळून तलवार आणि काठीने हल्ला केला. त्यात आनंद जाधव आणि गोरख रामचंद्र गायकवाड हे जखमी झाले. तर डांगरे याने माझे बहीण फौजदार आहे तुम्हाला बघून घेतो असे म्हणत त्यांच्या खिशातील पैसे काढून घेतले असे त्याच्या फिर्यादीत नमूद आहे. तर विठ्ठल सौदागर डांगरे (वय ३४) याने दिलेल्या विरुद्ध फिर्यादीवरून कृष्णा जाधव, आनंद जाधव, सोमनाथ जाधव, गोरख गायकवाड आणि एक अनोळखी इसम अशा ५ जणाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. जाब विचारण्यावरून आनंद जाधव याने कोयत्याने तर इतर आरोपींनी लोखंडी गज आणि काठीने मारहाण केली. त्यात विठ्ठल डांगरे आणि त्याची आई अनुसया असे दोघे जखमी झाले. असे डांगरे यांच्या फिर्यादीत नमूद आहे पुढील तपास हवालदार वाघमोडे करीत आहेत.



### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



हे पण कर्जदार दिसताहेत!

**कल्याण**

**170-83-139**

**मेन बाजार**

**278-77-160**

## डीसीसी बँकेत मक्तेदारांच्या माध्यमातून ३०० कर्मचाऱ्यांची भरती


### ■ कुशल तरुणांना प्राधान्य, गणवेश होणार सक्तीचा, शाखांचा होणार विस्तार

सुराज्य/सोलापूर

**आर्थिक अडचणीतील सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी अर्थात डीसीसी बँके नफ्यामध्ये आणल्यानंतर बँकेच्या माध्यमातून कार्पोरेट सेवा देण्यासाठी कुशल आणि तांत्रिक ज्ञान असलेल्या तरुणांना प्राधान्य देत खाजगी ठेकेदारांच्या माध्यमातून ३०० कर्मचाऱ्यांची मेगाभरती करण्याचा निर्णय घेतला आहे. बँकेला रिझर्व बँकेची परवानगी देखिल मिळाली आहे. लवकर निविदा काढून ही भरती प्रक्रिया केली जाणार असल्याने डीसीसीचे कर्मचारी एकचा गणवेशात आणि सुटात बुटात दिसणार असल्याची माहीती प्रशासक कुंदन भोळे यांनी दिली.**

कर्ज वाटपातील अनियमितता, वसुलीतील दिरंगाई यामुळे आर्थिक अडचणीत आलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करून २०१८ मध्ये तत्कालीन महायुती शासनाने बँकेवर प्रशासकाची नियुक्ती केली. सुरूवातीला तत्कालीन जिल्हा उपनिबंधक अविनाश देशमुख, त्यानंतर अपर निबंधक शैलेश कोतमिरे व आता कुंदन भोळे हे प्रशासक म्हणून काम पाहत आहेत. कोतमिरे यांनी आपल्या अनुभवातून अगोदर बँकेतील अनावश्यक खर्चाला फाटा देत त्यावर नियंत्रण आणून एक शिस्त आणण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर विविध योजना राबवून बँकेची गमावलेली पत परत मिळविण्यासाठी खटाटोप सुरू केला. याला कर्मचाऱ्यांच्या मदतीने हळूहळू यश आले आहे. बँक तोट्यातून बाहेर पडून तब्बल ३४ कोटी ७५ लाखाचा नफा झाला आहे. आता बँकेच्या पुनर्वैभवाविषयी अधिकारी, कर्मचाऱ्यांबरोबरच सर्वांच्याच आशा पल्लवित झाल्या आहेत. मात्र बँकेत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या जागा मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. प्रतिवर्षी ६० ते ७० कर्मचारी सेवानिवृत्त होत आहेत. त्यामुळे कामकाज करण्यास मोठ्या अडचणींचा सामना प्रशासनास करावा लागत आहे. यासाठी प्रशासक कुंदन भोळे यांनी कर्मचाऱ्यांची भरती करण्याचा निर्णय घेतला आहे. कर्मचारी भरती करण्याची परवानगी मिळाली आहे. त्यामुळे लवकरचा खासगी मक्तेदारांच्या माध्यमातून ३०० कर्मचाऱ्यांची भरती केली जाणार आहे. यांची जाहीर निविदा लवकर काढली जाणार आहे. भरती प्रक्रिया राबवतना कुशल व तांत्रिक ज्ञान असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येणार आहे.





### ड्रेसकोड होणार सक्तीचा

जिल्हा मध्यवर्ती बँकेला कार्पोरेट लुक देण्याचा प्रशासक कुंदन भोळे यांचा प्रयत्न आहे. बँकांच्या स्पर्धेत टिकण्यासाठी मार्केटिंग आणि शिस्त म्हत्वाची आहे त्यामुळे लिपिक, अन्य कर्मचारी, अधिकारी व प्रशासकांनाही एकच ड्रेसकोड लागू करण्यात येणार आहे. त्यामुळे याची लवकरच सर्व कर्मचारी सुटा बुटात व इनशर्ट केलेले दिसणार आहेत.

### शहराच्या विविध भागात शाखांचा विस्तार

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अनेक शाखा अडगळीत आहेत.एकाच भागात दोन दोन शाखा आहेत.काही भागात शाखा नसल्याने सेवा द्यायला अडचणी येत आहेत. त्यामुळे एकाच भागात असलेल्या अनेक शाखा स्थलांतरीत करून त्या शहराच्या पूर्व भाग, जुळे सोलापूर, विजापूर रोड आदी भागात चालू केल्या जाणार आहेत. या सर्व शाखा ऑनलाईन प्रणालीच्या माध्यमातून एकत्र केल्या जाणार आहेत.

CMYK

# नका करू दर्पोक्ती

विदर्भाला लागून असलेल्या छत्तीसगडमध्ये नक्षलींनी घडवून आणलेल्या सुरुंग स्फोटात दहा जवान शहीद झाले. या घटनेने पुन्हा एकदा नक्षलवादाचा मुद्दा ऐरणीवर येणे साहजिकच आहे. नक्षली समस्या संपली अथवा संपवली अशी दर्पोक्ति करणे किती महागात पडू शकते हे या हल्ल्याने पुन्हा एकदा दाखवून दिले आहे. मध्य भारतातील जंगलात प्रभावक्षेत्र निर्माण करून सरकारांना जेरीस आणणारे नक्षली असे हल्ले करताना प्रामुख्याने गनिमी पद्धतीचा वापर करतात. या पद्धतीला छेद देत अभियान कसे राबवावे याचे प्रशिक्षण जवानांना दिलेले असते. त्यानुसार कामगिरी बजावताना थोडी जरी चूक झाली तरी जवान नक्षलींच्या सापळ्यात अडकतात. दंतेवाड्यातील अरणपूरच्या जंगलात मोहीम आटोपून परत येताना केलेला वाहनाचा वापर जवानांच्या जिवावर बेतला. यातील धक्कादायक बाब म्हणजे आजवर सर्वाधिक वेळा जवान परत येतानाच अशा सापळ्यात अडकले आहेत. जवान नक्षली सापळ्यात अडकू नये यासाठी केंद्रीय गृहमंत्रालयाने सर्वच राज्यांसाठी ही पद्धत आखून दिली आहे. यात शोधमोहीम राबवताना नेहमी पायी फिरणे, एकत्र न फिरता ठरावीक अंतर राखून फिरणे, प्रभाव क्षेत्रातून बाहेर पडेपर्यंत वाहनांचा वापर न करणे, सर्वांत आधी बॉम्बशोधक पथकाकडून रस्ता मोकळा (रोड ओपनिंग) करून घेणे, त्यात काही आढळले तर शोधमोहिमेचा मार्ग बदलणे, ज्या रस्त्याने जंगलात प्रवेश केला, त्याच रस्त्याने माघारी न येता दुसरा रस्ता निवडणे, अशा अनेक गोष्टींचा समावेश आहे. त्याचे पालन प्रत्येकाने करावे असे बंधन राज्य तसेच केंद्रीय दलांच्या



जवानांवर घालण्यात आले आहे. अनेकदा नियमित गस्तींची सवय झालेले जवान या कार्यपद्धतीकडे दुर्लक्ष करतात. जंगलातील कच्च्या रस्त्यावरून पायी चालतात, पण डांबरी रस्ता लागला की वाहनात बसण्याची घाई करतात. अरण्यपूरमध्येसुद्धा जवानांना तीच घाई नडली. मोहिमेवर जाताना व परतताना वेगवेगळे रस्ते वापरावेत असे कार्यपद्धतीत नमूद असले तरी असा पर्याय सर्वच ठिकाणी उपलब्ध नसतो. त्यामुळे अनेकदा त्याच रस्त्याने परत यावे लागते. या घटनेत सुद्धा तेच घडले. रोजची गस्त करताना एकाच रस्त्याचा वारंवार वापर जवानांनी केला. त्यामुळे पाळतीवर असलेल्या नक्षलींना सुरुंग पेरणे व सापळा रचणे सोपे झाले. नक्षलींच्या प्रभाव क्षेत्रात तळ ठोकून राहणे व रोज मोहीम राबवणे ही अतिशय खडतर व जोखमीची बाब आहे. स्थानिकांचे पाठबळ लाभलेले नक्षली अचानक हल्ला करू शकतात, सापळे रचतात हे लक्षात घेऊन जवानांना 'जंगल वॉरफेअर'चे प्रशिक्षण दिले जाते. असे प्रशिक्षण देणारी एकमेव संस्था छत्तीसगडमधील काँकेरला आहे. त्यात सर्वच जवानांना सामावून घेणे शक्य नाही. त्यामुळे अशा संस्थांनी संख्या वाढवावी असे प्रस्ताव अनेकदा तयार झाले, पण त्यावर अंमल झाला नाही. सद्यःस्थितीत या संस्थेतून प्रशिक्षण घेतलेले मोजकेच अधिकारी व जवान इतरांना प्रशिक्षित करत असतात. दरवर्षी उन्हाळ्याची चाहूल लागली की नक्षलींकडून 'टॅक्टिकल काउंटर ऑफेन्सिव्ह कॅंपेन' (टीसीओसी) राबवले जाते. या काळात जंगल विरळ झालेले असते. शिवाय तेंदूपाने गोळा करण्याचा हंगाम सुरू असल्याने स्थानिक लोक सुद्धा जंगलात मोठ्या प्रमाणावर असतात. परिणामी नक्षलींना आपसूकच संरक्षणाचे कवच प्राप्त होते. याचा फायदा घेत नक्षली शत्रूंशी कसे लढायचे याचा सराव करतात. ही बाब सुरक्षा दलांनासुद्धा ठाऊक असते. त्यामुळे ते याच काळात मोठ्या प्रमाणावर शोध मोहिमा हाती घेतात. परिणामी या काळात चकमकी व हल्ल्यांचे प्रमाण वाढते. अलीकडे नक्षलींकडून होणारा हिंसाचार कमी झाला असला तरी त्याचा आधार घेत ही चळवळ संपली असे म्हणणे धारिष्ट्याचे ठरू शकते हे या हल्ल्याने दाखवून दिले. छत्तीसगडचाच विचार केला तर चार जुलै २०२१ ला झालेल्या मोठ्या हल्ल्यानंतर या राज्यात बऱ्यापैकी शांतता होती. त्यामुळे राज्य व केंद्र सरकार चळवळ संपल्याचा उघड दावा करू लागले. प्रत्यक्षात हिंसाचार कमी झाल्याचा संबंध ही चळवळ संपण्याशी जोडणे हेच मुळात चूक. एका विशिष्ट विचारधारेवर चालणारी ही चळवळ अनुकूल स्थिती निर्माण होईपर्यंत हिंसा करत नाही. त्यासाठी कितीही काळ वाट बघण्याची नक्षलींची तयारी असते. हिंसा कमी झाली म्हणजे नक्षलींचा वावर कमी झाला असा अर्थ काढणेसुद्धा चुकीचेच ठरते. सरकारांकडून नेहमी ही चूक घडत आली आहे. सरकारच्या या भूमिकेमुळे जंगलात तळ ठोकून असलेल्या जवानांमध्येसुद्धा शैथिल्य येते. त्याचा मोठा फटका बसू शकतो हे या घटनेने दाखवून दिले आहे. या हल्ल्याने छत्तीसगडसह महाराष्ट्र आणि आंध्र या राज्यांमधील सरकारांना सतर्क रहावे लागेल.

## कृषीजगत

# एकत्र कुटुंब पद्धतीतून शेती विकास

**भारतीय शेती ही विशेषत: ग्रामीण भागात दिसून येते. शहरी भागातील शेतीचे स्वरूप त्या मानाने मर्यादित आहे. ही भारतीय शेती नानाविध समस्यांनी ग्रासलेली आहे. भारतीय समाजरचनेचा महत्त्वाचा भाग असणाऱ्या एकत्र कुटुंब पद्धतीचे आज कमी होणारे प्रमाण किंवा होऊ पाहणारा ऱ्हास आणि विभक्त कुटुंब पद्धतीचे वाढणारे प्रमाण याचा शेती विकासावर विपरीत परिणाम होतो. यासाठी एकत्र कुटुंब पद्धतीचा होणारा ऱ्हास थांबविणे काळाची गरज आहे. त्यावरदेखील शेती विकास अवलंबून आहे.**

ग्रामीण भाग आणि एकत्र कुटुंब पद्धती हे एक समीकरणच आहे, किंबहुना या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. शहरी भागातही एकत्र कुटुंब पद्धती आहे, परंतु त्याचे प्रमाण कमी आहे. भारतीय संस्कृतीची शान असणाऱ्या एकत्र कुटुंब पद्धतीला आजच्या जमान्यात घरघर लागली असून ही पद्धती हळूहळू कमी होऊन विभक्त कुटुंब पद्धतीचा विस्तार मोठ्या प्रमाणावर होत आहे. एकत्र कुटुंब पद्धतीमुळे शेतीच्या विकासाला जी मदत होत होती किंवा होत आहे त्याचे प्रमाण हळूहळू कमी होत आहे. त्यामुळे शेती विकासाचा वेग अपेक्षेपेक्षा कमी दिसतो. शेतजमिनीच्या विभाजनाच्या आणि तुकडीकरणाच्या अनेक कारणांपैकी एक महत्त्वाचे कारण म्हणजे जमिनीच्या वाढणाऱ्या किमती होय. जमिनीच्या वाढणाऱ्या किमतींमुळे मोठी शेतकरी कुटुंबे विभक्त होत आहेत. हे प्रमाण कमी करणे व थांबविणे महत्त्वाचे आहे. शेतजमिनीचे विभाजन व तुकडीकरण झाल्यास मनुष्यबळ, शेतजमीन, शक्तीसाधने यांसारख्या सर्वच महत्त्वाच्या घटकांमध्ये विभाजन होते. त्यांचे श्रेष्ठत्व कमी होते. याचा विपरीत परिणाम शेती उत्पादनावर होतो. शेतीचे उत्पादन संख्यात्मक आणि गुणात्मकदृष्ट्या घटते.

एकत्र कुटुंब पद्धतीत शेतकरी आणि त्याचे पूर्ण कुटुंब एकत्र नांदतात. त्यात चार-पाच मुले, त्याची पत्नी, सुना आणि लहान मुले अशा पद्धतीची ढोबळमानाने रचना आहे. हे एक मोठे पण एकत्र असणारे कुटुंब शेती विकासास मोठ्या प्रमाणावर मदत करते. या पद्धतीत घरातल्या घरात जास्त श्रमिकांची उपलब्धता होते. अशा वेळी श्रमिकांवरील खर्च वाचतो. घरातील व्यक्तींनी काम केल्यामुळे एक प्रकारचा विश्वास निर्माण होऊन शेतमालाची गुणवत्ता वाढण्यास मदत होते. मोठ्या प्रमाणावर असणारी जमीन एकत्रपणे वापरता येते. तिचे तुकडीकरण न होता एकसंध जमिनीवर पिके घेता येतात.

विनाकारण बांधबंदिस्तीखाली सुपीक जमीन वाया न जाता त्याची शेती उत्पादन वाढीसाठी मदत होते. याच पद्धतीमुळे भांडवलाची उपलब्धता किंवा पैशांची उभारणी मोठ्या प्रमाणावर होते. त्याचा उपयोग शेती विकासासाठी करता येतो. त्यात विहीर बांधणे, जमीन सपाटीकरण, शेततळे, पाईपलाईन, शेतीची इतर अवजारे व यंत्रे खरेदी करणे, द्राक्षे किंवा इतर बागेची बांधणी करणे, शेतमाल साठवणूक, बैल, बैलगाडी यांची खरेदी, बियाणे, खते, कीटकनाशके यांची खरेदी करता येते तसेच इतर प्रकारचा खर्च जसे लग्नकार्य, घरबांधणी यावरदेखील खर्च करता येतो.



शेतीच्या विविध कामांची कुटुंबातील व्यक्तींच्या आवड आणि पात्रतेनुसार चांगल्या प्रकारे विभागणी करता येते आणि तीच कामे त्यांनी वर्षानुवर्षे केल्यामुळे त्या कामात त्यांना एक हातोटी आणि कौशल्य प्राप्त झाल्यामुळे ती कामे चांगली होण्यास मदत होते. एकत्र कुटुंब पद्धतीत घरातील मुलांना चांगल्या प्रकारे शिक्षण घेता येते. त्यासाठी वेळ किंवा पैसा सहजासहजी कमी पडत नाही. अशाप्रकारे चांगल्या शिक्षणाची संधी मिळाल्यामुळे भविष्यकालीन शेती विकासाचा तो आधार ठरतो. याच मुलांना स्पर्धात्मक परीक्षांमध्ये यश मिळवता येते. त्यानंतर त्यांच्याकडून परिवाराला आणि शेती विकासाला एक नवी दिशा प्राप्त होऊ शकते. अशाप्रकारे एकत्र कुटुंब पद्धतीत बरेच फायदे असताना त्यातील किरकोळ दोष आपण कमी करून किंवा दुर्लक्षित करून एकत्रीकरणाचा फायदा शेतीसाठी कसा घेता येतो याकडे लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे आहे.

**- प्रा. डॉ. कृष्णा शहाणे.**

## टुडेज् ब्लॉग

# विकास नकोय, फक्त विरोध

**महाराष्ट्रात जेव्हा एखादा प्रकल्प त्या भागात येतो, तेव्हा तेथील नागरिक, ग्रामस्थ प्रकल्पातून आपणाला काय फायदा होणार आहे? आपल्या भागाचा कसा विकास होणार आहे? हे समजून घेतात. थोडाफार विरोध करतात आणि आपणाला हव्या असलेल्या मागण्यांची पूर्तता करून घेतात. उर्वरित महाराष्ट्राचे हे चित्र आहे. परंतु कोकणात कोणताही प्रकल्प येऊ द्या त्याला विरोध हा ठरलेलाच असतो. त्या प्रकल्पाच्या फायद्या-तोट्याची चर्चा कधीच जे विरोध करतात, त्यापैकी कोणी करीत नाही. कोकणातील जैतापूर अणुऊर्जा प्रकल्प आणि रिफायनरी प्रकल्प या दोन्ही प्रकल्पांना विरोध करणारे विरोधी भूमिका घेणारे कोण आहेत? त्यांचा विरोध हा राजकीय फायद्यासाठीचा आहे. हेच वास्तव आहे. पसरवून खोडेबनाव करून सांगायचे आणि त्यांना रस्त्यावर उतरवायला लावायचे हेच काम केले जात आहे.**

जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पाच्या निमित्ताने नाटे जैतापूर भागात चार-सहा वेळा जाणे झाले. अगदी जैतापूर प्रकल्पाला तीव्र विरोध असताना नाटे परिसरात फिरलोय. काही लोकांना भेटलोय. तेव्हा नाटे भागात जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पाचे नाव घेणेही अवघड होते. एवढा तीव्र विरोध होता. या विरोधाची कारणे इतकी होती की ती ऐकून सहज लक्षात येत होतं. प्रकल्पाला विरोध करणाऱ्या शिवसेना पुढाऱ्यांनी एवढ्या पुड्या सोडल्या होत्या की, कोणीही त्यावर सहज विश्वास ठेवला पाहिजे. असेच वातावरण करण्यात आले होते. हा प्रकल्प झाल्यावर जन्माला येणारी मुलं लुळी, पांगळी असणार. या भागात वंध्यत्वाचे प्रमाण अधिक वाढणार, समुद्रातील मासे संपून जाणार, अशा अनेक विषयांची मांडणी शिवसेनेकडून करण्यात आली होती. कोकणातील जनतेने या अफवांवर विश्वास ठेवून विरोध केला. खा. विनायक राऊत, आ. राजन साळवी यांनी विरोध करण्यामागे कारण काय होती? हेदेखील कोकणातील जनतेने शोधली पाहिजेत.

फक्त लोकसभा, विधानसभा निवडणुका होत्या. या निवडणुकित मतांचे राजकारण करण्यात आले. त्याचा पद्धतशीर फायदा खा. विनायक राऊत यांनी दोन्ही वेळच्या निवडणुकीत उठवला. या



आठ वर्षांत केंद्रात आणि राज्यात सत्तेत सहभागी शिवसेना होती; परंतु रिफायनरी नको, सीवर्ल्ड नको, आणखी कोणता प्रकल्प नको म्हणणाऱ्यांनी दुसरा प्रकल्प कोकणात आणण्यासाठी प्रयत्न करायला हवे होते. प्रकल्पाला विरोध करायचा आणि आपण काही करायचे नाही, या धोरणाने कोकणात प्रकल्प येत नाहीत. प्रकल्प आला की, त्याला नाव ठेवत राहायची, त्याला विरोध करत राहायचे हेच काम कोकणात गेली काही वर्षे सुरू आहे. कोकणात कोणत्याच चांगल्या कामाला, प्रकल्पाला सकारात्मकतेने पाहिले जात नाही. फक्त विरोध कसा करायचा याचेच नियोजन केले जाते. कोकणातील जनतेलाही नेमके हवंय तरी काय? असा प्रश्न अनेक वेळा मनात येऊन जातो. याच कारण स्वार्थाने वागणारे राजकीय पुढारी (सर्वच पक्षांचे) त्यांना सोईची वाटणारी, ठरणारी भूमिका घेतात आणि कोकणातील जनता फरफटत जाते.


रत्नागिरी जिल्ह्यातील ग्रामीण भागातील जनता मोलमजुरी करून उदरनिर्वाह करणाऱ्यांची संख्या अधिक आहे. या हातावर पोट असणाऱ्यांना प्रकल्पातून काय होणार आहे. यातली सत्य माहिती सांगितलीच जात नाही. सामान्य जनतेला कसा त्रास होणार आहे. कसे नुकसान होणार आहे. हे सांगून शेतकऱ्यांची डोकी भडकवली जातात आणि मग त्यातून विरोध सुरू होतो. नाणार, बारसू रिफायनरी प्रकल्पाच्या बाबतीतही असेच होत आहे. नाणार भागातील शेतकऱ्यांनीही हजारो एकर जमीन विकली आहे. बारसू भागातही मोठ्या प्रमाणात जमीन विक्री करण्यात आली आहे. असे असतानाही होणारा हा विरोध कोणाचा? कशासाठी? असाच प्रश्न उपस्थित होतो.

विरोध करणाऱ्या असंख्य सर्वसामान्य जनतेला या प्रकल्पाला आपण कशासाठी विरोध करतोय, हेदेखील समजून आलेले नसेल. बारसू येथे जमीन सर्वेक्षण केले जात आहे. त्याला शेतकरी विरोध करीत आहेत. प्रकल्पात ज्याचं काही जात नाही, ते देखील विरोध करायला सर्वात पुढे असतात आणि मग सामाजिक जाणीव म्हणून आमचा विरोध आहे. समाजाचे कसे नुकसान होऊ शकेल यासाठी आमचा विरोध आहे, असे सांगितले जाते. प्रकल्पाला विरोध करायचा तर जरूर करा; परंतु कोकणात यापुढे मग कोणताच प्रकल्प येणार नाही आणि काही होणारही नाही. प्रकल्पांना विरोध करणाऱ्या राजकीय नेत्यांनी विकासाचा विषय आल्यावर बोट समोर दाखवण्याची आवश्यकता नाही. बरं कोकणातील जनतेची मानसिकताही समजून येत नाही. कोणत्याही गोष्टीला विरोध करण्यासाठी काहींचा पुढाकार आहेच आहे. कोकणातील जनतेला विरोध करायला लावले जाते. विरोधाची मानसिकता आपल्यामध्ये ठासून भरलेली आहे. जेव्हा एखादा प्रकल्प उभा राहतो, तेव्हा त्या प्रकल्पासंबंधी कोणतीही माहिती न घेता आपण विरोध करतो हे थांबवले पाहिजे. आपला प्रकल्पातून फायदा काय होणार? हे समजून घेऊन जास्तीचा फायदा घेण्यासाठी प्रयत्न करायला हवेत; परंतु उगाचच विरोध करत राहणे सोडले पाहिजे. विरोध करायला कोण प्रवृत्त करतोय, हे विरोधाचे नेतेपण करणाऱ्यांनाही थांबवण्याची गरज आहे. आणखी किती वर्षे आपण विरोध करत राहणार, हे एकदाच आपणच ठरवलं पाहिजे. ज्या माळरानावर गवतही उगवत नाही तेथे प्रकल्पांच्या रूपाने जर काही उभे राहणार असतील, रोजगाराच्या संधी निर्माण होणार असेल, तर त्यासाठी सर्वांनीच सकारात्मकतेने विचार करायला हवा. रिफायनरी प्रकल्प बारसूत उभारण्यासाठी त्याच बारसं होण्यापूर्वीच त्याला विरोध हे अनाकलनीय आहे. ग्रामीण भागात अजून कितीतरी प्रयत्न करावे लागणार आहेत.

**- संतोष वायंगणकर.**

## जन्म हा अखेरचा

# कायानुग्रहस्थल - ३



म्हणून संतसंग हे संसारातील एक अमूल्य रत्न आहे.

दुसरे रत्न आहे 'हरिभजन'. संतांकडे गेल्यावर ते आपल्याला भगवद्भक्तीचा मार्ग दाखवतात. वाल्मीकीला तेव्हा नारदाची संगत लाभली तेव्हा त्यांनी त्याला नामजपाचा उपदेश केला. आपल्या इष्टदेवतेचे भजन करणे म्हणजे तिच्या प्रतिमेची पूजा करणे, तिच्या नामाचा जप करणे, तिच्या निराकार रुपाचे चिंतन करणे, शरीर, वाणी आणि मन या त्रिकरणांनी भगवंताची सेवा करणे म्हणजे हरिभजन होय. 'दया' हे तिसरे रत्न आहे. तुम्ही हरिभजन करता, सत्संग करता, परंतु जर तुम्हाला दीनदुबळ्यांची दया येत नसेल तर तुमचे भजन, तुमचा सत्संग व्यर्थ आहे. देवघरात देवाची मनोभावे पूजा करणाऱ्या मनुष्याने दारात आलेल्या भिकाऱ्याला वाक्तडन केले, हाकलून दिले तर त्याच्या पुजेला काय अर्थ आहे? दया हा एक श्रेष्ठ धर्म आहे. प्राणिमात्राविषयी दयाभावना ठेवली पाहिजे. दया करणे म्हणजे दुसऱ्याला सुख देणे. जो दुसऱ्याला सुख देऊ शकत नाही तो स्वत: सुखी होऊ शकत नाही. दयेमुळे दया करणारा आणि ज्याच्यावर दया केली जाते तो असे दोघेही सुखी होतात. म्हणून दया हे तिसरे सुखरत्न होय.

चौथे सुखरत्न आहे 'धर्म'. धर्म म्हणजे उत्तम आचरण. सत्य बोलणे, हिंसा न करणे, इष्टदेवतेची पूजा करणे, गुरुमंत्राचा जप करणे, ध्यान करणे, दान करणे हे सारे धर्म होत. धर्माचे दहा प्रकार सांगितले आहेत. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, दया, क्षमा, दान, पूजा, जप आणि ध्यान. या धर्माचरणामुळे पुण्यप्राप्ती होते आणि पुण्यप्राप्तीमुळे सुखलाभ होते. आपल्याला सुखी व्हायचे असते, परंतु ज्यामुळे सुखप्राप्ती होते ते धर्माचरण मात्र नको असते.

पुण्यस्य फलमिच्छन्ति
पुण्यं नेच्छन्ति मानवा: ।

पुण्याचे फळ सर्वांना हवे असते पण, पुण्य करणे, कोणालाच नको असते. दान करा, ध्यान करा, जप करा असे सांगितले तर त्याचे एकच उत्तर असते. 'नाही' सुख असे थोडेच मिळते? चांगले काम केले तर पगार मिळतो, वाईट केले तर मिळत नाही. इहलोकात जे घडते तेच परमार्थजगात घडत असते. पुण्य कराल तर सुख मिळेल, अन्यथा नाही. याच्या उलट आणखी एक गोष्ट आहे.

पापस्य फलं नेच्छन्ति पापं कुर्वन्ति यत्नत: । पापाचे फळ दु:ख हे आहे. दु:ख कोणाला नको असते, परंतु पाप मात्र यत्नपूर्वक करतात. शास्त्रनिषिद्ध कर्मामुळे मनुष्य पापात्मा होऊन दु:ख भोगतो.

**(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

# नक्षलवाद्यांची दहशतवादी कृत्ये थांबविण्यात गांभीर्य हवे

छत्तीसगडच्या काही भागात नक्षलवाद्यांचा प्रभाव संपलेला नाही त्याची प्रचिती काल दंतेवाडा येथे जिल्हा राखीव सुरक्षा रक्षकांच्या अकरा जणांची हत्या केली गेली त्यावरून सिद्ध झाले. नक्षलवाद्यांच्या या दहशतवादाचा निषेध नेहमीप्रमाणे सर्व क्षेत्रांतून केला गेला. दहशतवादी कृत्यांचा फोफावत्या हिंसाचाराच्या घटना घडण्यापूर्वी गुप्तचर यंत्रणांना त्याची आगाऊ खबर का लागत नाही याचा सखोल अभ्यास करताना समन्वय, त्रुटी शोधून त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची तयारी ठेवावी लागेल. देशांतर्गत फोफावणाऱ्या दहशतवादाला सीमेपलीकडून खतपाणी मिळते की अंतर्गत नैराश्यापोटी काही समूहांकडून अशा हत्याकांडांचा पाया रचला जातो ह्याची केंद्रीय तसेच राज्य सुरक्षा, गुप्तचर यंत्रणांना पोलखोल करावीच लागेल. त्यासाठी नक्षलवादी प्रभावाखाली येणाऱ्या परिसराची नाकेबंदी करून प्रत्येक वस्तूंमधून युद्धपातळीवर शोध मोहीम हाती घ्यावी लागेल. एप्रिल २०१० मध्ये ७६ सुरक्षा जवान, एप्रिल २०१७ मध्ये सुकमा जिल्ह्यात २५ सीआरपीएफ जवान, एप्रिल २०१९ मध्ये भाजपा आमदारासह ४ सुरक्षा कर्मचारी, मार्च २०२० मध्ये सुकमा, मिनपा येथे १६ सुरक्षा कर्मचारी, एप्रिल २०२१ मध्ये २२ सुरक्षा कर्मचारी यांचे नक्षलवादी हल्ल्यात मृत्यू झाले. हा घटनाक्रम विचारात घेता सरकारांना नक्षलवादाविरोधी कारवायात किती गांभीर्य आहे ते लक्षात येते. मृत्युमुखी पडणाऱ्यांच्या कुटुंबीयांना थोडीफार आर्थिक मदत केली की झाले! अशी तर धारणा सरकारांची होत नाही



ना? असे प्रश्न उपस्थित होतात. कारण हल्ल्यांनंतर तपास, हल्लेखोरांविरोधातील शोधमोहिमांच्या नियोजनांत सातत्य, सुसूत्रता यांचा अभाव असल्यामुळेच त्यांचे हल्ले सुरू राहात असावेत असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. त्यामुळे नक्षलवादी हल्ले आणखी किती काळ सुरू राहणार असे प्रश्न पडतात. जर दहशतवाद, नक्षलवाद हे देशांतर्गत प्रश्न आहेत तर ते सोडविण्यासाठी दहशतवाद्यांचा खात्मा करून सुटत नसतील तर त्यांवर विनाशस्त्र उपाययोजना करण्याचे प्रयत्न केले जावेत. दहशतवाद्यांचे प्रश्न समजून घेत त्यावर उपाय केल्यास निष्पाप सुरक्षा कर्मचारी, सुरक्षा जवान यांच्या हत्यांत वाढ होणे थांबू शकते.

**- स्नेहा राज, गोरेगाव.**

# माणसं का ओळखू येत नाहीत?

**मी माणूस ओळखण्यात चुकलो, मला अजिबात माणसं ओळखू येत नाहीत, मला वाटलंच नव्हतं तो किंवा ती अशी बदलेल, मला कळलंच नाही असं कसं झालं, हे माझ्यासोबतच का होतं? लोकं माझाच गैरफायदा घेतात का? मलाच लोकं फसवतात, माझाच विश्वासघात का होतो? मला वापरून घेतात, नंतर विसरून जातात. आपल्या दैनंदिन जीवनात आपण अनेकदा अनेकांकडून यासारखे वक्तव्य ऐकत असतो. याही पलीकडे जाऊन पाहिलं तर प्रत्येकाला असंच वाटत असतं की, मी खूप सरळमार्गी आहे, मी कधी कोणाला फसवलं नाही, कोणाला दुखावलं नाही, मी कोणाचं वाईट केलं नाही. मी निस्वार्थीपणे सगळ्यांना मदत केली, सगळ्यांना समजावून घेतलं, होईल तेवढी मदत करत आलो मग मलाच अशी वागणूक का?**

आपल्याला, आपल्या आजूबाजूच्या सगळ्यांनाच समाजातून, कुटुंबातून, नातेवाइकांकडून, मित्र-मैत्रिणी इतर मंडळींकडून असे अनुभव येत असतात की, मी यांना ओळखू शकलो नाही, हे बदलले, हे आधी असे वागत नव्हते आता असे का वागत आहेत? आपल्याला वाटतं कोणी स्वतःचा स्वार्थ साधून घेतला, कोणाला वाटतं आपल्याला लोकच धार्जिणे नाहीत, कोणाला वाटतं आपल्या भोळ्या, सरळ स्वभावाचा फायदा लोकांनी करून घेतला. आपल्या आयुष्यात असलेल्या, संपर्कात आलेल्या प्रत्येकाची जीवनशैली, मानसिकता, विचार, जगण्याची तसेच वागण्याची पद्धत, स्वअनुभव, आपल्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगवेगळ्या स्वरूपाचा असतो. तसेच त्यांना स्वतःला येणारे आणि आलेले अनुभव पण अनेक प्रकारचे असतात. म्हणूनच माणसं सतत बदलत असतात.



काल आपल्याशी एकदम नीट वागलेला माणूस आज नीट वागेल, याची शाश्वती नाही. दोन दिवसांपूर्वी दिलेला शब्द तो आज खरा करेल, याबाबत भरोसा नाही. काल त्याचा मूड जसा होता, तसा तो कायम असेल, हा पण भरवसा नाही. आपण मात्र विचार करत बसतो, याला काय झालं, माझं काही चुकलं का, मी कुठे कमी पडलो? तसं काहीही असो अथवा नसो. तरीही पूर्ण जग आणि त्यानुसार जीवन पण बदलत आहे. जग जितक्या जलद गतीने बदलते तितकेच ताबडतोब लोक बदलतात. कारण त्यांना या बदलत्या जीवनाशी जुळवून घ्यायचं असते. लोकांना मागे पडायचं नसतं, मागे राहायचं नसते. काल काय घडलं, काल काय बोललो, काल काय ठरवलं हे ते आज विसरतात, कारण त्यांना आजमध्ये जगायचं असतं आणि उद्याची तयारी करायची असते. खूप कमी माणसं अशी असतात, जी इतरांशी नसतील पण स्वतःशी प्रामाणिक असतात. त्यांच्या आयुष्यात काही तत्त्व, मूल्य त्यांनी जोपासलेली असतात आणि ती अमलात आणणे ते स्वतःचं कर्तव्य समजतात. आपल्यामुळे एखादी व्यक्ती दुखावली गेली की नाराज झाली, याच्याशी त्यांना काहीही देणे-घेणे नसते. त्यांना भूतकाळात राहायचं नसते. जेवढा जितका संबंध आला, काम झालं, तेवढ्यापुरत्या भेटीगाठी झाल्या की लगेच पुढील मार्ग धरायचा. झाली घटना, झाली गोष्ट तिथेच विसरायची, ती व्यक्ती पण विसरायची आणि पुढे जात राहायचं हा जीवनाचा नियम झाला आहे.

आपल्या स्वतःच्या वैयक्तिक मतांना, आपल्या जगण्याच्या आणि विचाराच्या पद्धतीला जो मॅच असेल तो टिकेल, आपल्याला जितकं आणि जे देणं शक्य आहे तितकं घेऊन जो गप्प बसेल तो राहील, जो नसेल तो आपोआप दूर होईल. त्यासाठी, त्याला टिकवण्यासाठी, ती ओळख, ते नातं समृद्ध करण्यासाठी कोणतेही कष्ट, त्रास घेणे अशा लोकांना गरजेचे वाटतं नाही. आपण इतकं प्रॅक्टिकल, प्रोफेशनल वागल्यावर आपल्याबद्दल कोण, काय विचार करेल, कोण काय बोलेल, कोणाला काय वाटेल याचा त्यांना काडी मात्रही फरक पडत नाही. जीवनाचे अतिशय सरळ, सोपं, साधं गणित मांडून लोकं जगत असतात. कोणासाठी थांबणं, कोणाला सांभाळणं, जपणं, वाट पाहणं, स्वतःला बदलणं, थोडं झुकणं, थोडं वाकणं, कोणाचा विचार करणं, कोणासाठी वेळ देणं याची लोकांना गरज वाटत नाही. कोणाला वेळ दिलाच तर तो फक्त कामापुरता, अगदीच वेळात वेळ काढून उपकार केल्यासारखं तोदेखील ठराविक तेवढ्या विषयापुरताच! ही सवय अनेकांना लागलेली आहे.

**- मीनाक्षी जगदाळे.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# उदंड झाला बेदाणा! भावच नाही, ठेवायचा कुठं?

## कोल्ड स्टोअरेज फुल्ल ; व्यापाऱ्यांची नफेखोरी; लाखोंचा माल 'राम भरोसे'

सुराज्य/सोलापूर

**यंदा बेदाण्याचं मोठ्या प्रमाणात उत्पादन झालं आहे. मात्र, व्यापाऱ्यांच्या नफेखोरी वृत्तीने कोट्यवधी रुपयांचा बेदाणा सध्या उघड्यावर ठेवायची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. सोलापूर जिल्ह्यात ३९ कोल्ड स्टोरेज असून यामध्ये ६४ हजार ५४७ मेट्रिक टन साठवून केली जावू शकते. परंतु यंदा उत्पादनच ८४ हजार मे.टनावर गेल्या मुळे उर्वरित बेदाणा ठेवायचा कुठे ? हा प्रश्न शेतकऱ्यासमोर उभा राहिला आहे.**



यंदा द्राक्षाचे भाव कोसळल्याने शेतकरी बेदाण्याकडे वळला आणि इथेच त्याला मोठा फटका बसला आहे.जो बेदाणा २०० ते २५० रुपयाने विकला जायचा, व्यापाऱ्याच्या नफेखोर वृत्तीने त्याला १२० रुपयांपर्यंतचा भाव मिळत आहे.विकायला भाव नाही, ठेवायला जागा नाही.अशी परिस्थिती शेतकऱ्यांची झाली आहे. सोलापूर जिल्ह्यात सुमारे २० हजार हेक्टर क्षेत्रात द्राक्ष लागवड असून त्यापैकी बऱ्याच क्षेत्रावरील द्राक्ष ही खुल्या मार्केट मध्ये विकली जातात.तर उर्वरित द्राक्षेचा बेदाणा तयार केला जातो.सततची गारपीट,रोगराई व औषधाच्या वाढलेल्या भरमसाठ किंमतीमुळे द्राक्ष शेती तोट्यात चालली आहे.यंदा

एका बाजूला मालाची विक्री होत नसल्याने कोल्ड स्टोअरेजमधील जागा भरत आहे. कोल्ड स्टोअरेजमध्ये जागा नसताना नव्याने तयार होणारा माल ठेवायचा कुठे? असा प्रश्न पडला आहे. त्यातच रोज गाड्या भरुन बेदाणा जिल्ह्यातील विविध कोल्ड स्टोरेज मध्ये दाखल होत आहे. यात प्रामुख्याने कर्नाटकातील बेदाणा जास्त असून सोलापूर आणि उस्मानाबाद जिल्ह्यातूनही मोठ्या प्रमाणात बेदाणा पंढरपूर मध्ये येत आहे.पंढरपुरात तयार होणाऱ्या बेदाण्यालाच इथल्या कोल्ड स्टोअरेजची क्षमता कमी पडत असल्याने येथील शेतकरी सांगली आणि तासगाव भागातील कोल्ड स्टोअरेजला बेदाणा पाठवत असतो. त्यातच यंदा राज्यात सर्वच ठिकाणी बेदाण्याचे दर जवळपास १०० रुपयाने घसरले. दर कोसळल्याने शेतकऱ्यांनी स्टोअरेजमध्ये ठेवलेला बेदाणा विकालाच नाही.

### भाव घसरल्याने बेदाणे कोल्ड स्टोअरेजमध्ये पडून

पंढरपूर परिसरात जवळपास ४० ते ४५ हजार मेट्रिक टन बेदाणा होत असतो. पंढरपूर परिसरात कासेगाव, करकंब येथे १२ कोल्ड स्टोअरेज आहेत, पण मालाची विक्रीच होत नसल्याने नवीन बेदाण्याला स्टोअरेजमध्ये ठेवण्यास जागाच मिळत नाही. मार्च आणि एप्रिलमध्ये स्टोअरेजमधील निम्म्यापेक्षा जास्त बेदाण्याची विक्री झाल्याने नवीन बेदाणा ठेवायला जागा होते. पण यंदा भाव पाडल्याने १० टक्के देखील विक्री झाली नसल्याचा आक्षेप द्राक्ष बागायतदारांनी केला आहे.अजूनही ४० टक्के बेदाणा शेडवर प्रोसेसिंगमध्ये आहे. तयार मालालाच जागा नसताना हा नवा तयार होत असलेला माल कुठे न्यायाचा? असा मोठा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे.

### बेदाण्यासाठी शेतकऱ्यांना किती खर्च येतो?

एक किलो बेदाणा बनवण्यासाठी शेतकऱ्याला ९० ते ९५ रुपये खर्च येतो. यानंतर तो स्टोरेजपर्यंत नेणे आणि स्टोरेजमध्ये ठेवण्यासाठी दर महिन्याला ५५० रुपये खर्च येतो. याशिवाय संपूर्ण मालाचा इन्शुरन्स, १८ टक्के जीएसटी, हमाली आणि इतर खर्चही शेतकऱ्याला भरावा लागतो. त्यामुळे सध्या मिळत असणाऱ्या १०० ते १२० रुपये भावात हे सर्व भागवणे शेतकऱ्यांसाठी अवघड बनले आहे.बेदाण्याला चांगला भाव मिळेल या आशेत शेतकरी आहे, त्यामुळे स्टोअरेजमधून माल बाहेर काढण्यास शेतकरी तयार नाही. चांगला भाव मिळून शेतकरी आपला माल बाहेर काढतील आणि स्टोअरेजमध्ये जागा होईल, या आशेत इतर शेतकरी आहेत.

### तरच खर्च निघणे शक्य

व्यापाऱ्यांची नफेखोरीची भूमिका, कोल्ड स्टोरेजची कमी क्षमता आणि उदंड झालेले उत्पादन यामुळे शेतकऱ्याचा कोट्यवधींचा बेदाणा सध्या राम भरोसे पडून आहे. राज्य शासनाने शेतीचे धोरण आखताना जागोजागी कोल्ड स्टोअरेजची व्यवस्था, व्यापाऱ्यांच्या नफेखोरीवर वेसण घातली तरच बेदाण्याला केलेला खर्च काढणे शेतकऱ्यांना शक्य होणार आहे. आधीच अवकाळीने संकटात असलेला शेतकरी लाखो रुपये खर्च करुन तयार केलेला बेदाणा उघड्यावर ठेवून चांगला भाव कधी मिळेल आणि विक्री कधी होईल, याच प्रतिक्षेत आहे.

## अक्कलकोट परिसरात दोन कारची समोरासमोर धडक

**सोलापूर** : अक्कलकोट ते गाणगापूरकडे कारमधून जात असताना अक्कलकोटच्या सात किलोमीटर परीसरात दुसऱ्या कारची धडक बसल्याने पाच जण जखमी झाले आहेत. ही घटना गुरूवारी दुपारी घडली. यात माहतंप्पा बसवणप्पा मसूती (वय-५५, रा. अक्कलकोट), लक्ष्मण सुक्रीव शिंदे (वय-१९, रा.परभणी), मिलिंद विठ्ठल बनकर (वय-४३, रा.विक्रोळी मुंबई), रोनक मिलिंद बनकर (वय-११, रा.मुंबई), आदिनाथ जानकीराम लवटे (वय-१८, रा.आनंदवाडी, परभणी) असे जखमी झालेल्यांची नावे आहेत. गुरूवारी दुपारी अक्कलकोट परिसरात दोन कारची समोरासमोर धडक झाली.यात दोन्ही वाहनातील पाच जण जखमी झाले. अपघातानंतर त्यांना लगेच उपचारासाठी १०८ म्ब्यूलन्स ने छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यात मसूती यांच्या पायाला जबर दुखापत झाली आहे, तर शिंदे याच्या डोळ्याला,मिलिंद यांच्या मानेला व आदिनाथ यांच्या डाव्या हाताला दुखापत झाली आहे. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

## लक्ष्मी मार्केटजवळ सळईने मारहाण; पिता-पुत्र जखमी

**सोलापूर** : पैशाच्या व्यवहारातून सळई आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत पिता-पुत्र जखमी झाले. ही घटना लक्ष्मी मार्केट परिसरातील मुल्लाबाबा टेकडी जवळ बुधवारी रात्रीच्या सुमारास घडली. सलीम जब्बार बागवान (वय ५०) आणि त्यांचा मुलगा साकीब बागवान (वय २२ दोघे रा.शुक्रवार पेठ) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. काल रात्री १० वाजेच्या सुमारास त्यांना पैशाच्या व्यवहारातून सलमान शेख, मेहबूब शेख आणि इतर पाच ते सहा जणांनी मिळून मारहाण केली अशी नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली आहे.

## मेव्हण्यांनी केली रॉडने मारहाण; भावजी जखमी

**सोलापूर** : पत्नीला नांदण्यास घेऊन जा, असे म्हणत लोखंडी रॉड आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणीतत समाधान गोरख बनसोडे (वय ३१ रा.फुलचिंचोळी ता.पंढरपूर) हा जखमी झाला. ही घटना गुरुवारी सकाळी पेनुर येथे घडली. त्याला उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याचे मेव्हणे योगेश गवळी आणि वैभव गवळी (रा.पेनुर) यांनी मारहाण केली. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## नशेत आत्महत्येचा प्रयत्न

दारूच्या नशेत एका तरुणाने विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना देगाव (ता.पंढरपूर ) येथे गुरुवारी सकाळच्या सुमारास घडली. अक्षय दत्ता दंदाडे (वय २७ रा.देगाव) असे विष प्राशन केलेल्या तरुणाचे नाव आहे. आज सकाळी ११ वाजेच्या सुमारास त्याने नशेत विष प्राशन केले होते. त्याला पंढरपूर येथे प्राथमिक उपचार करून वडिलांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे.

## हत्तरसंग कुडल तीर्थक्षेत्र विकास आराखड्याचा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा

सुराज्य/सोलापूर

हत्तरसंग कुडल तीर्थक्षेत्राचा विकास आराखडा तयार करताना धार्मिक महत्त्व आणि पर्यटनाच्या अनुषंगाने विचार करावा. आराखड्यात व्यावहारिक आणि गरजेची प्राधान्यक्रमाची विकास कामे प्रस्तावित करावीत. भाविकांना पायाभूत सुविधा मिळाव्यात याचा विचार करून आराखडा तयार करावा, असे आदेश जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी दिले. हत्तरसंग कुडल तीर्थक्षेत्र विकास आराखड्याची बैठक नियोजन भवन येथे झाली यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते.



या बैठकीस आमदार सुभाष देशमुख, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संजय माळी, कार्यकारी अभियंता दत्तात्रय गावडे आणि श्रीनिवास गुजरे, भीमा कालवा मंडळाचे अधीक्षक अभियंता बागडे, जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे, नगररचनाकार आर. सी. दनाने, डॉ. व्यंकटेश मेतान, प्रल्हाद कांबळे, यांच्यासह ग्रामविकास, बांधकाम, पाटबंधारे, महावितरण अशा संबंधित विभागाचे प्रमुख, देवस्थान समितीचे सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते. सल्लागार आशुतोष पाटील यांनी हत्तरसंग कुडल तीर्थक्षेत्राच्या विकास आराखड्याचे सादरीकरण केले. यावेळी टाकळी मुख्य महामार्गापासून तीर्थक्षेत्रपर्यंत रस्ता, भाविकांची संख्या, भीमा व सीना या दोन्ही नदीतीरावर मंदिराच्या बाजूस घाट बांधणे व नद्यांना येणाऱ्या संभाव्य पुरापासून मंदिराचे संवर्धन होण्यासाठी तटबंदी बांधणे, पर्यटकांसाठी बोटिंग सुविधा, पूरसंरक्षक भिंती, वॉटर लेझर शो, चिल्ड्रेन पार्क, कारंजे असणाऱ्या उद्यानाची निर्मिती, श्री संगमेश्वर कुस्ती केसरी स्पर्धेसाठी कुस्ती स्टेडियम, व्यापारी गाळे, भक्त निवास, स्वच्छतागृहे, पुरातत्व वास्तु संग्रहालय, अन्न छत्र, ध्यान मंदिर, गोशाळा, सोलर पथदिवे, सुसज्ज ग्रंथालय, वाहनतळ, बसवेश्वर स्मारक आदि विषयांवर चर्चा करण्यात आली.

## श्री नृसिंह जन्मोत्सव सोहळ्यास कर्देहळ्ळी येथे आजपासून प्रारंभ

**सोलापूर** : कर्देहळ्ळी (ता.द.सोलापूर) येथे श्री नृसिंह महाराजांच्या जन्मोत्सव सोहळ्यास आजपासून प्रारंभ होत असून यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह अंतर्गत गुरूवार, ४ मेपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

**दररोज नामवंत कीर्तनकारांची कीर्तने**

या सप्ताहात दररोज रात्री स१डेआठ ते साडेदहा या वेळेत नामवंत कीर्तनकारांची कीर्तने व हरिजागराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. शुक्रवार, २८ एप्रिल रोजी ह.भ.प. हणमंत काळे महाराज (लातूर), शनिवार, २९ रोजी ह.भ.प. आबा महाराज पाटील (कुरनूर), रविवार, ३० रोजी ह.भ.प. रामहरी शेंडगे महाराज (वडाळा), सोमवार, १ मे रोजी ह.भ.प. ॲड. पांडुरंग लोमटे महाराज (धाराशिव), मंगळवार, २ मे रोजी ह.भ.प. दत्ता महाराज भोसले (कोंडी), बुधवार, ३ मे रोजी ह.भ.प. माऊली महाराज दिंडेगावकर (तुळजापूर) यांची कीर्तने होणार आहेत. गुरूवार, ४ मे रोजी नृसिंह जन्मोत्सवानिमित्त दुपारी २ ते ४ या वेळेत दिंडी मिरवणूक काढण्यात येणार आहे. यानंतर सायंकाळी ५ वाजता ह.भ.प. सुधाकर महाराज इंगळे (सोलापूर) यांचे गुलालाचे कीर्तन होणार आहे. रात्री ९ वाजता नृसिंह भजनी मंडळ, कर्देहळ्ळी, तानाजी मदने (पुळूजवाडी, ता.मोहोळ) व पांडुरंग गवळी (सांगोला) यांचा भारुडाचा जुगलबंदी कार्यक्रम होणार आहे. भाविकांनी या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री नृसिंह जन्मोत्सव सोहळा समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

## मोटारसायकलला धडक, दोघे ठार

**सांगोला** : तालुक्यातील हातीद गावाशेजारील पाचेगाव खुर्द ते सोमेवाडी येथील घाडगे वस्ती जवळ अज्ञात वाहनाने समोरून धडक दिल्याने मोटारसायकलवरील संजय वसंत खरात (वय ४२) व महादेव मारुती आलदर (वय ५५ रा.सोमेवाडी) हे दोघे जागीच ठार झाल्याची घटना घडली.

संजय खरात व महादेव आलदर हे दोघेजण मोटार सायकल नंबर एम एच ४५ एल ४१६२ वरून पाचेगाव खुर्द वरून गावाकडे म्हणजे सोमेवाडी कडे येत असता शिवाजी घाडगे यांच्या घराजवळ अज्ञात वाहनाने भरधाव व अविचाराने चालवून समोरून धडक दिल्याने मोटार सायकल वरील खरात व आलदर दोघेजण गंभीर जखमी होऊन जागीच ठार झाले.

## उद्योजकाच्या घरात घुसून रिव्हॉल्वर दाखवल्याप्रकरणी तरूणावर अदखलपात्र गुन्हा

सुराज्य/सोलापूर

भरदिवसा शहरातील उद्योजकाच्या घरात घुसून त्याला रिव्हॉल्वर दाखवल्याची घटना बुधवारी दुपारी इंद्रधनु अपार्टमेंट मध्ये घडली.दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी संबंधीत तरुणाला ताब्यात घेतल्यानंतर ती बंदूक नकली असल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी तरूणावर अदखलपात्र गुन्हा दाखल झाला आहे.


इंद्रधनु अपार्टमेंट येथे विक्रम बंडेवार हे उद्योजक राहतात. ते बुधवारी घरी असताना त्यांच्या घरी एक तरुण आला. त्याने थेट बंदुक काढून विक्रम यांच्याकडे रोखत पैशांची मागणी केली. पैसे न दिल्यास गोळी घालतो अशी धमकी दिली.



यावेळी घरातील सदस्यांनी समजवण्याचा प्रयत्न केल्यानंतरही तो तरूण ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. त्याच धावपळीत विक्रम यांच्या मुलीने या घटनेची माहिती शेजार्यांना दिली. शेजार्यांनी याची माहिती पोलिसांना दिली. माहिती कळताच फौजदार चावडी पोलिस ठाण्याचे वपोनि उदयसिंग पाटील हे आपल्या पोलिस अधिकार्यांसह घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी लगेच त्या तरुणाला ताब्यात घेत पोलिस ठाण्यास आणले. दरम्यान, पोलिसांनी त्या तरुणाकडून जप्त केलेली बंदूक ही नकली असल्याचे तपासात निष्पन्न झाले. दरम्यान, याबाबत संबंधित तरूणावर अदखलपात्र गुन्हा दाखल झाला आहे.

## न्यू बुधवार पेठेत तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

सुराज्य/सोलापूर



न्यू बुधवार पेठेतील रमाबाई आंबेडकर नगरात राहणाऱ्या केशव आनंद दिलपाक (वय २७) या तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना बुधवारी सायंकाळच्या सुमारास घडली.

काल सायंकाळी सात वाजेच्या सुमारास केशव दिलपाक याने घरातील छताच्या लोखंडी हुकाला साडीच्या सहाय्याने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून सुमित (भाऊ) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. मात्र तो उपचारापूर्वीच मयत झाला. या घटनेची नोंद जोडभावी पेठ पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार जमादार पुढील तपास करीत आहेत.

## मृतदेह आढळला

फताटेवाडी (ता.दक्षिण सोलापूर) येथील रेल्वे रुळाजवळ शंकर कल्लप्पा बालकुंदे (वय ५२ रा.नागणसूर ता.अक्कलकोट ) याचा मृतदेह बेवारस अवस्थेत आढळून आला.

**CHANGE IN NAME**

I HEREBY DECLARE THAT MY OLD NAME HASNODDIN HAJIMIYAN SAB INAMDAR HAS BEEN CHANGED TO **HASANODDIN HAJIMIYA INAMDAR** RESIDING 370/20, MUSLIM PACCHA PETH, SOLAPUR-413005 (MAHARASHTRA). KINDLY NOTE THE SAME.

## बार्शीत भगवंत महोत्सवाचे उद्घाटन

### २ मेपर्यंत दररोज विविध कार्यक्रम

सुराज्य/बार्शी



बार्शी नगरीचे ग्रामदैवत श्री भगवंत प्रकटोत्सव निमित्त बार्शी नगरपालिका, भगवंत देवस्थान व भगवंत बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भगवंत महोत्सवाचे उद्घाटन आमदार राजेंद्र राऊत यांच्या हस्ते तसेच प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

भगवंत महोत्सव २०२३ मध्ये दि २६ एप्रिल ते २ मे पर्यंत विविध मनोरंजनात्मक, आध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. संपूर्ण भारत देशात भगवंताचे एकमेव मंदिर असुन भगवंत महोत्सवाच्या माध्यमातून भगवंताची किर्ती सर्वत्र पसरावी तसेच बार्शी तालुक्यातील लोकांचे विविध सांस्कृतिक व अध्यात्मिक कार्यक्रमातून मनोरंजन व्हावे यासाठी हा महोत्सव साजरा करण्यात येत आहे असे आमदार राऊत उदघाटन प्रसंगी म्हणाले. यावेळी डॉ.बी.वाय.यादव, भगवंत देवस्थानचे अध्यक्ष दिलीप बुडूख, माजी नगराध्यक्ष आसिफ तांबोळी, रमेश पाटील, डीवायएसपी जालिंदर नालकुल, तहसीलदार सुनील शेरखाने, पोलीस निरीक्षक संतोष गिरीगोसावी, मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण, नायब तहसीलदार संजीवन मुंढे, भगवंत महोत्सव समितीचे अध्यक्ष सुभाष लोढा, बाजार समितीचे संचालक रावसाहेब मनगिरे, माजी नगरसेवक विजय राऊत, बाजार समितीचे सभापती रणवीर राऊत, विलास रेणके, वैद्यकीय अधिकारी डॉ. शितल बोपलकर, गटविकास अधिकारी माणिकराव बिचकुले, अभिजित सोनिग्रा, संतोष सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

### पहिल्या दिवशी अवकाळी पावसाने व्यत्यय

महोत्सवानिमित्त पहिल्या दिवशी आनंद शिंदे यांच्या भावगीते व भक्तीगीतांचा कार्यक्रम होता. उद्घाटन सत्र संपल्यानंतर कार्यक्रमास सुरुवात झाली. गणेश वंदना झाल्यानंतर अवकाळी पावसाने हजेरी लावली. विजांच्या कडकडाटासह पाऊस झाल्याने कार्यक्रमात व्यत्यय आला.

## युगदर्शक आयकॉन पुरस्काराचे बार्शीत वितरण

सुराज्य/बार्शी

बार्शी येथून वितरित होणारा युगदर्शक आयकॉन पुरस्कार सोहळा यंदा दहाव्या वर्षात पदार्पण करीत असून हा कार्यक्रम शनिवारी दि. २९ एप्रिल रोजी स्व. यशवंतराव चव्हाण सांस्कृतिक भवन येथे सायं. सहा वाजता होत आहे.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून सुप्रसिध्द ज्योतिषतज्ज्ञ, आनंदी वास्तूचे प्रमुख आनंद पिंपळकर, खासदार ओमराजे निंबाळकर, सावता परिषद संस्थापक अध्यक्ष काकासाहेब आखाडे, पोलीस निरीक्षक संतोष गिरीगोसावी, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री दिलीप सोपल यांची प्रमुख उपस्थिती असणार असल्याची माहिती युगदर्शक आयकॉन सोहळ्याचे प्रमुख विश्वस्त नितीन भोसले यांनी पत्रकार परिषदेत दिली. यातील बार्शी आयकॉनसाठी ओंकार एकशिंगे (युवा), ॲड. प्रशांत एडके (विधी), डॉ. प्रमोद जाधवर (वैद्यकिय), राहुल कोंढारे (उद्योग), मल्लिकार्जुन धारुरकर (पत्रकार), राज्यस्तरीय आयकॉनसाठी दीपक रांगे (सरपंच), सुरेश शेळके (समाजसेवा), तहसीलदार सौदागर तांदळे (महसूल), नितीन मुंडे (पोलीस), रामराजे गोरे (कृषि), शिल्पा शेटे (महिला) या मान्यवरांची निवड करण्यात आली.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, सोलापूर**
**सात रस्ता, कारीगर पेट्रोल पंपासमोर, सोलापूर ४१३ ००३**
e-mail-solapur2.ee@mahapwd.com दुरध्वनी / फॅक्स क्र.(०२१७) २३१२३०२
**ई- निविदा सुचना क्रमांक ०१ सन २०२३-२४ (ऑनलाईन)**

**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, सोलापूर** योग्य त्या सक्षम कंत्राटदारांकडून खालील कामाकरिता **बी-१** नमुन्यातील निविदा ई-निविदा-प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग क्र.२, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. तसेच सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल झाल्यास खालील नमूद केलेल्या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध करण्यात येईल.

**टिप** वरील ई-निविदा सुचना मध्ये एकूण ०३ कामांचा समाविष्ट असून वरील निविदेबाबतची संपूर्ण माहिती खालीलप्रमाणे संकेतस्थळावर **दि. २८/०४/२०२३** पासुन उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत (रु. लक्ष) |
|---|---|---|
| १ | मोहोळ ढोकबाभूळगांव सय्यद वरवडे रस्ता प्रजिमा-१४४ किमी ०/०० ते ३/०० मध्ये सुधारणा करणे, ता.मोहोळ,जि.सोलापूर | **१५९.५५ लक्ष** |
| २ | टेंभुर्णी बेंबळे परिते वरवडे-व्होळे-भेंड-पडसाळी भुताष्टे चिंचोली माढा रस्ता प्रजिमा १७ किमी २३/०० ते २६/०० मध्ये सुधारणा करणे ता.माढा,जि.सोलापूर | **२०७.१९ लक्ष** |
| ३ | वरवडे-व्होळे-भेंड-पडसाळी रस्ता प्रजिमा १७ किमी २६/०० ते ३२/०० मध्ये सुधारणा करणे (भाग भेंड ते पडसाळी) ता.माढा,जि.सोलापूर | **१५४.०० लक्ष** |

१) http://mahapwd.com
२) http://mahatenders.gov.in
३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, सोलापूर कार्यालयातील सूचना फलक.

सही/-
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजननिक बांधकाम विभाग क्र.२ , सोलापूर**

**जा.क्र. साबांवि-२/लेखा/निविदा/११३९/सन२०२३**
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग क.२, सोलापूर
**दिनांक १९/ ०४ /२०२३**

## सिंहगड इन्स्टिट्यूटच्या
# सर्व इमारतींना १५ दिवसात वापर परवाना द्यावा




### महापालिकेला सर्वोच्च न्यायालयाचे आदेश
### बारा वर्षानंतर अखेर सत्याचा विजय झाला : नवले

सुराज्य/सोलापूर

**केगाव येथील सिंहगड इन्स्टिट्यूटच्या सर्व इमारतींना १५ दिवसात बांधकाम परवानगी व त्या इमारती वापर करण्याची परवानगी देण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने सोलापूर महानगरपालिकेला दिले. बारा वर्षानंतर अखेर सत्याचा विजय झाला, अशी माहिती सिंहगड इन्स्टिट्युट सोलापूरचे सचिव संजय नवले यांनी पत्रकार परिषदेत दिली.**

केगाव येथील सिंहगड इन्स्टिटयूटच्या बेकायदेशीर इमारतीसंदर्भात मंगळवारी दि. २४ एप्रिल रोजी अंतिम सुनावणी पूर्ण झाली. यामध्ये सोलापूर सिंहगड इन्स्टिटयूट च्या बाजूने निकाल देताना या इमारतींना नियमितता देऊन १५ दिवसांत सर्व इमारतींना वापर परवाना देण्याचे आदेश सोलापूर महापालिकेस सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश कृष्णा मुरारी व संजय कुमार यांनी हा निकाल दिला आहे, असे सचिव संजय नवले यांनी सांगितले.

सन २०११ मध्ये सिंहगड इन्स्टिटयूटने मनपाकडून मंजूर झालेल्या ले-आऊट प्रमाणे नवीन इमारत बांधकाम परवानगीसाठी परिपूर्ण प्रस्ताव सादर केल्यानंतर इमारत बांधकामांना सुरुवात केली होती. दाखल केलेल्या प्रस्तावास मनपाकडून विहित कालावधीत मंजुरीबाबत न कळविल्याने त्यास परवानगी मिळाली आहे असे गृहीत धरून सिंहगडने बांधकामे पूर्ण केले.

दरम्यान तत्कालीन मनमा आयुक्त चंद्रकांत गुडेवार यांनी सदर इमारतींना बांधकाम परवाना देता येणार नाही व या इमारती पाडकामाचे आदेश दिले होते. याबाबत सिंहगड संस्थेने जिल्हा न्यायालय व उच्च न्यायालयात धाव घेतली. दरम्यान अनुक्रमे अपील व रीट पीटीशन च्या अंतिम निकालाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात २०१९ साली विशेष परवानगी याचिका दाखल केली होती. या प्रकरणाची अंतिम सुनावणी पार पडली असून संकुलातील अस्तित्वात असलेल्या इमारतींना नियमितीकरण प्रस्तावानुसार वापर परवाना पुढील १५ दिवसात देण्याचे आदेश मनपास देण्यात आले आहेत.

याप्रकरणी सिंहगड इन्स्टिट्यूटतर्फे ॲड. रवींद्र अडसुळे यांनी काम पाहिले. या पत्रकार परिषदेस सिंहगड इन्स्टिट्यूटचे प्राचार्य शंकर नवले, प्रशासन अधिकारी दत्ता नवले आदी उपस्थित होते.

#### जादा शुल्क भरल्यास परत करण्याचे आदेश

२०१५ साली उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार २०१५ साली संस्थेने दाखल केलेला बांधकाम नियमितीकरण प्रस्तावास तात्कालिन आयुक्तांनी २०१७ व २०२२ साली मान्य केला असून संस्थेने भरलेले विकास शुल्क हे प्रचलित नियमानुसार आहे का? जादा शुल्क आकारले आहे याची तपासणी करून जादा शुल्क भरले असल्यास ते सिंहगड इन्स्टिटयूटला परत करण्याचे हक्क न्यायालयाने अबाधित ठेवला आहे.

## आज मतदान
# अक्कलकोट बाजार समितीच्या निवडणुकीसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज
### यंदा १ हजार ६६८ मतदार मतदानाचा हक्क बजावणार

सुराज्य/अक्कलकोट

**संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागून राहिलेल्या अक्कलकोट कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीसाठी यंदा १ हजार ६६८ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यासाठीची प्रशासकीय यंत्रणा सज्ज असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अमर झालटे व सहाय्यक निवडणूक अधिकारी सिद्धेश्वर कुंभार यांनी दिली. यासाठी आज शुक्रवारी सकाळी ८ ते ५ या वेळेत मतदान पार पडणार आहे.**

एकुण सहा केंद्र असून यावर ७० कर्मचारी तसेच प्रत्येक केंद्रावर पाच पोलीस, एक सहाय्यक पोलीस निरीक्षक असे जवळपास एकूण १२० कर्मचारी तैनात करण्यात येणार आहेत, असेही म्हणाले. अक्कलकोट, हन्नूर, वागदरी, जेऊर आणि तडवळ या ठिकाणी मतदान केंद्र असणार आहेत. सहकारी संस्था गटात ७४८, ग्रामपंचायत गटातून ७०७, हमाल व तोलार गटातून ६९, व्यापारी मतदारसंघातून १३८ अशा मतदारांचा समावेश आहे. अक्कलकोट बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात ५९ सहकारी संस्था तसेच ७८ ग्रामपंचायती येतात.

या ठिकाणी १८ जागांसाठी ४२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. मतदान पार पडल्यानंतर येत्या (रविवारी) सायंकाळी ५ वाजता अक्कलकोट येथे मतमोजणी होईल, अशी माहितीही निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिली आहे.

#### संवेदनशील मतदान केंद्रावर पोलिसांची नजर

अनेक दिवसानंतर अक्कलकोट तालुक्यामध्ये दोन्ही बाजार समितीच्या निवडणुका लागल्या आहेत. या पार्श्वभूमीवर कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांकडून देखील या सर्व घटना घडामोडींवर करडी नजर राहणार आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. राजेंद्रसिंह गौर यांनी विशेष बंदोबस्त ठेवला आहे. संवेदनशील गावे आणि मतदान केंद्रावर पोलिसांची विशेष नजर असणार आहे.




## संभाजी महाराज महामंडळाचे जाधव ट्रस्टी अध्यक्ष तर गेजगे उत्सव अध्यक्ष

**सुराज्य/सोलापूर** : सालाबादप्रमाणे यंदाही छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त फडकुले सभागृह येथे शिवपुत्र संभाजी महाराज मध्यवर्ती महामंडळची बैठक संपन्न झाली. यावेळी मध्यवर्ती महामंडळच्या ट्रस्टी अध्यक्षपदी राम जाधव तर उत्सव अध्यक्षपदी राजा गेजगे यांची एकमताने निवड करण्यात आली. ११ मे रोजी मध्यवर्ती महामंडाळाच्यावतीने छत्रपती संभाजी महाराजाची स्थापना केली जाणार आहे. १४ मे रोजी सायंकाळी चार वाजता चार हुतात्मा चौकातून मिरवणूकीस प्रारंभ होणार आहे. या मिरवणुकीमध्ये दहा ते पंधरा मंडळे सहभागी होण्याची शक्यता आहे. चार हुतात्मा चौक, सरस्वती चौक, मेकॅनिक चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे छत्रपती संभाजी महाराज चौकात मिरवणुकीची सांगता होणार आहे. यंदा उत्सव पदाधिकारी म्हणून उपाध्यक्षपदी रोहन जाधव,गोटू गायकवाड, राहुल बनसोडे तर कार्याध्यक्षपदी ऋषी घोलप, खजिनदारपदी राहुल गायकवाड, गणेश देवकते, सचिवपदी आकाश येळणे, दिनेश सिद्धे, सहसचिवपदी सागर गायकवाड, किरण क्षीरसागर, सोशल मीडिया प्रमुख म्हणून ललित धावणे, ओम आंदेली, ओम सपकाळ, दत्ता वाघमोडे यांची नियुक्ती करण्यात आली. छत्रपती संभाजी महाराज मंडळांचे संस्थापक अध्यक्ष हे ट्रस्टी म्हणून राम जाधव, उपाध्यक्षपदी अजिंक्य पाटील, सचिवपदी सागर शितोळे तर खजिनदारपदी निशांत सावळे यांची नियुक्ती करण्यात आली तर महामंडळाच्या सल्लागार समितीमध्ये नाना काळे, पुरुषोत्तम बरडे, राजन जाधव, मतीन बागबान, श्रीकांत घाडगे, श्रीकांत डांगे, सोमनाथ राऊत, भाऊ रोडगे, आप्पा सपाटे, मुन्ना वानकर, मनीष काळजे, लहू गायकवाड, राजा आलुरे, नागेश खरात, सदाशिव पवार, अमोल केकडे, अंबादास शेळके, सुरज बंडगर, चेतन गायकवाड, चंद्रकांत पवार, श्याम कदम, जितू वाडेकर यांची निवड करण्यात आली.

## 'जागतिक पशुवैद्यक दिना' निमित्त रविवारी स्वेरीत विविध कार्यक्रम

**सुराज्य/पंढरपूर** : येत्या रविवार दि. ३० एप्रिल रोजी 'जागतिक पशुवैद्यक दिना' च्या निमित्ताने गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या इंटरनॅशनल कॉन्फरन्स हॉलमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे' अशी माहिती पंढरपूरमधील ज्येष्ठ पशुवैद्यक प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. विश्वासराव मोरे यांनी दिली. रविवारी दिवसभर आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन पुण्यातील पशुसंवर्धन विभागाचे अतिरिक्त आयुक्त, डॉ. शीतल मुकणे व स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान पुणे विभागाच्या पशुसंवर्धन विभागातील सह आयुक्त डॉ. संतोष पंचपोर हे भूषविणार आहेत. या कार्यक्रमासाठी साताऱ्यामधील पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. अंकुश परिहार, सोलापूरमधील पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. भास्कर पऱ्हाडे, कराडमधील तालुका पशु चिकित्सालयाचे सहाय्यक आयुक्त डॉ.दिनकर बोर्डे व सोलापूर जिल्ह्याचे पशुसंवर्धन अधिकारी डॉ. नवनाथ नरळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यावेळी स्व. डॉ. सुहास देशपांडे जीवनगौरव पुरस्काराचे वितरणही केले जाणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सहआयुक्त डॉ. सत्यवान भिंगारे, डॉ. प्रियांका जाधव-कोळेकर, मंगळवेढ्याचे पशुधन विकास अधिकारी डॉ. ब्रह्मदेव कदम, डॉ. तानाजी भोसले, पशुधन पर्यवेक्षक अविनाश रसाळे व पंढरपूरमधील पशुवैद्यक प्रतिष्ठानचे ज्येष्ठ सचिव डॉ. अनिल सरदेशमुख यांच्यासह संघटनेचे सर्व सदस्य, पदाधिकारी आदी परिश्रम घेत आहेत.

## सरुबाई धांडोरे यांचे निधन



**सुराज्य/अकलूज** : माळशिरस तालुक्यातील तांदुळवाडी येथील सरूबाई नामदेव धांडोरे यांचे वृद्धपकाळाने वयाच्या ९० व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन विवाहित मुले, चार विवाहित मुली, सुना नातवंडे असा परिवार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव समिती पुणे माजी जिल्हाध्यक्ष भीमराव धांडोरे यांच्या त्या मातोश्री होत्या.

# मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा अन्यथा नगरपालिकेत सोडू
### मनसेचा इशारा

सुराज्य/कुर्डूवाडी

**कुर्डूवाडी शहरातील मोकाट जनावरांमुळे मोठ्या प्रमाणात नागरिकांना त्रास सहन करावा लागत असून यामुळे अनेक नागरिक जखमी झाले आहेत. या मोकाट जनावरांचा नगरपरिषदेने बंदोबस्त करावा अन्यथा कुर्डूवाडी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने नगरपालिकेच्या मुख्याधिकारी यांच्या दालनासमोर मोकाट जनावरे बांधण्याचा मनसे अध्यक्ष आकाश लांडे यांनी इशारा दिला आहे.**

शहरामध्ये मोकाट जनावरांची संख्या वाढत असून या जनावरांमुळे भाजी विक्रीसाठी बसलेल्या विक्रेते व शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान करीत आहेत. तसेच ज्येष्ठ नागरिक महिला व मुले बाजारात आले असताना मोकाट जनावरे पाठीमागून धडक देतात. धडक दिल्यामुळे अनेक नागरिक जखमी झाले आहेत. बाजारात एका युवकास मोकाट जनावरांनी मारल्यामुळे युवकाच्या डोक्यात गंभीर मार लागला या घटनास्थळी मनसेच्या महिला अध्यक्ष रेखा चांदणे यांनी धाव घेत जखमीला उपचारासाठी दवाखान्यात दाखल केले आहे. यामुळे युवकास आर्थिक भुर्दंड सोसावा लागला. यापूर्वीही मनसेने शहरातील मोकाट जनावरांचा बंदोबस्ताची मागणी केली होती.

मात्र याकडे नगरपालिका प्रशासनाने दुर्लक्ष केले. या मोकाट जनावर मारल्यानंतर कोणाचे प्राण जाण्याची वाट पाहत आहेत का? असा सवाल मनसेचे आकाश लांडे यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. या मोकाट जनावराचा त्वरित बंदोबस्त करावा अन्यथा नगरपालिकेच्या प्रत्येक विभाग प्रमुखाच्या कार्यालासमोर जनावरे बांधण्याचा इशारा मनसेच्यावतीने देण्यात आला आहे.

#### मोकाट जनावराच्या पाठीमागे कुणाची ताकद ?

कुर्डूवाडी नगरपरिषदेने मोकाट जनावरे पकडण्यासाठी ट्रॉली खरेदी करण्यात आली आहे. मात्र या ट्रॉलीचा उपयोग नगरपरिषद करत नसल्याचे दिसत आहे. नागरिकांचे निवेदन आल्यावर दोन दिवस जनावरे दिसत नाहीत. मात्र चौथ्या दिवशी पुन्हा तीच मोकाट जनावरे बाजारपेठ फिरत असल्याचे चित्र दिसत आहे. या मोकाट जनावरांच्या पाठीमागे कोणती शक्ती आहे. आरोग्य विभाग याकडे दुर्लक्ष करीत असल्याने सवाल उपस्थित होत आहे.

## लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत वेळापूरचा अनिकेत राज्यात पहिला

सुराज्य/वेळापूर



वेळापूर शेरी बारा फाटा (तालुका माळशिरस) येथील बाळासाहेब गुलाबराव माने देशमुख यांचे पुतणे अनिकेत सिद्धेश्वर माने-देशमुख याने लोकसेवा आयोगाच्या परीक्षेमध्ये राज्यात पहिला येऊन यश मिळवले आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्यावतीने घेण्यात आलेल्या दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या परीक्षेमध्ये वेळापूर शेरी येथील रहिवासी व राहुरी येथील अण्णासाहेब शिंदे कृषी अभियांत्रिकी तंत्रज्ञान महाविद्यालय राहुरीचा एम. टेक. चा विद्यार्थी अनिकेत सिद्धेश्वर माने देशमुख याने मुख्य परीक्षेत २०० पैकी १५१.५० टक्के गुण मिळवून महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे.प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील, आमदार रणजीतसिंह मोहिते-पाटील, आमदार रामभाऊ सातपुते, भाजपा जिल्हा संघटन सरचिटणीस धैर्यशील मोहिते-पाटील, भाजपा माळशिरस तालुका उपाध्यक्ष व वेळापूर सोसायटीचे चेअरमन अमरसिंह माने-देशमुख, महादेव देवालय ट्रस्टचे अध्यक्ष अमृतराज माने देशमुख, डॉ. अमर माने, संदीप माने देशमुख, संदीप कदम, ओंकार माने देशमुख, अण्णासाहेब चव्हाण यांनी शुभेच्छा दिल्या.

# नव्या आव्हानांचा सामना करण्यासाठी विद्यापीठांनी सज्ज व्हावे : डॉ. अभय जेरे
### भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचा स्थापना दिन

सुराज्य/सोलापूर

**झपाट्याने बदलणाऱ्या जगात उच्च शिक्षणातील नव्या आव्हानांचा सामना करण्यासाठी विद्यापीठांनी सज्ज व्हावे, असे मत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. अभय जेरे यांनी व्यक्त केले भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या २८ व्या स्थापना दिन समारंभात ते बोलत होते.**

भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्यावतीने देण्यात येणारे जीवनसाधना गौरव पुरस्कार ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शांतीलाल मुथा आणि ज्येष्ठ इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार यांना राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, भारती विद्यापीठाचे कार्यवाह आमदार डॉ. विश्वजीत कदम, कुलगुरू डॉ. विवेक सावजी, भारती हॉस्पिटलच्या कार्यकारी संचालिका डॉ. अस्मिता जगताप, कार्याध्यक्ष आनंदराव पाटील, कुलसचिव जी. जयकुमार उपस्थित होते.

डॉ. जेरे म्हणाले, 'येणाऱ्या काळात नोकऱ्यांमध्ये खूप मोठे बदल होणार आहेत. आपण गिगा इकॉनॉमीकडे वाटचाल करत आहोत. पूर्वीप्रमाणे एकदा पदवी घेतली की झाले, असे चालणार नाही. दर दहा वर्षानंतर आपल्याला शिकत राहावे लागणार आहे. तरुण पिढीला शिकवणे हे आजच्या शिक्षकासमोर मोठे आव्हान आहे. यासाठी आपण तयार व्हायला हवे.'




डॉ. शिवाजीराव कदम म्हणाले, 'कृत्रिम बुद्धिमत्तेचे नवे आव्हान शिक्षण क्षेत्रासमोर आहे. परदेशी विद्यापीठांच्या आगमनामुळे इथल्या विद्यापीठांना आंतरराष्ट्रीय विद्यापीठांशी स्पर्धा करावी लागणार आहे. शांतीलाल मुथा म्हणाले, 'मूल्यवर्धित शिक्षणाचा उपक्रम भारती विद्यापीठाने त्यांच्या शाळांमध्ये राबवायला हवा.'

डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, 'अनेकांना गरीबी हा शाप वाटतो, पण गरीबी वरदान आहे. गरीबी हा सर्वात महान संस्कार आहे. त्यामुळे डॉ. पतंगराव कदम यांच्यासारखे शिक्षण महर्षी निर्माण होतात. मला मिळालेला हा पुरस्कार हा राजर्षी शाहू महाराज आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा पुरस्कार आहे. डॉ. विवेक सावजी यांनी प्रास्ताविक केले. जी. जयकुमार यांनी आभार मानले. डॉ. ज्योती मंडलिक आणि राजेंद्र उत्तुरकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## म. बसवेश्वर अध्यासन केंद्राचे उद्या उद्घाटन

**सुराज्य/सोलापूर** : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठास महाराष्ट्र शासनाने महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्रास मंजुरी दिली आहे. या अध्यासन केंद्राचे उद्घाटन शनिवार दि. २९ एप्रिल रोजी सकाळी ११:३० वाजता विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात होणार आहे. उद्घाटन प्रथम कुलगुरू प्रा. डॉ. इरेश स्वामी यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ.मृणालिनी फडणवीस उपस्थित असणार आहेत. विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. डॉ. राजेश गादेवार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा उद्घाटन समारंभ होणार आहे. तसेच, बसव साहित्य प्रचारक प्रा.डॉ. आप्पासाहेब पुजारी, केंद्रीय विद्यापीठ कलबुर्गी येथील कन्नड शास्त्रीय अध्ययन केंद्राचे संचालक प्रा.डॉ.बी.बी. पुजारी हे उपस्थित असणार आहेत.असे आवाहन विद्यापीठाच्या कुलसचिव योगिनी घारे आणि महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्राचे संचालक प्रा. डॉ.केदारनाथ काळवणे यांनी केले आहे.

# जिल्हा बालसंरक्षण कक्षाने रोखला बालविवाह

सुराज्य/मोहोळ

मोहोळ तालुक्यातील खंडाली येथे होऊ घातलेला बालविवाह रोखण्यात जिल्हा बाल संरक्षण कक्षाला यश आले आहे. एका ३१ वर्षीय तरूणाचा विवाह १६ वर्षीय अल्पवयीन बालिका (रा. मौजे येवती ता. मोहोळ) हिच्यासोबत होणार असल्याची माहिती जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अतुल वाघमारे यांना भ्रमणध्वनीद्वारे मिळाली. त्यानुसार वाघमारे यांनी जिल्हास्तरावरून सर्व सूत्रे हलवत होऊ घातलेला बालविवाह रोखण्यात यश मिळवले.

सदर बालविवाह रोखण्याकामी मोहोळचे पोलीस निरीक्षक विनोद घुगे, महिला पोलीस कॉन्स्टेबल अनुसया बंडगर, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अतुल वाघमारे, संरक्षण अधिकारी उज्ज्वला कापसे, चाईल्ड लाईनचे योगेश स्वामी यांचे पथक तयार करण्यात आले. सदर पथक



विवाह स्थळी नवऱ्या मुलाच्या घरी पोचले असता घरासमोर लग्न मंडप घातलेला दिसून आला. त्याचं लग्न मंडपात पिवळी साडी घातलेली हळदीचा विधी पूर्ण केलेली बालिका बसल्याचे आढळले.

पथकाने चौकशी केली असता त्या बालिकेचे वय १६ वर्षे असल्याचे आढळले. त्यामुळे पोलीस पथकाने बालिकेस ताब्यात घेतले. बालिकेचा जबाब नोंदवून सदर बालिकेला बालकल्याण समिती सोलापूर यांच्या समक्ष हजर केले असून समितीने बालिकेस बालगृहात दाखल करून घेतले आहे.

सदर बालविवाह रोखण्याची यशस्वी कार्यवाही जिल्हा कार्यक्रम अधिकारी जावेद शेख, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी डॉ. विजय खोमणे, परिविक्षा अधिकारी दीपक धायगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# सॅटेलाईट मोजणीमुळे बांधाचा वाद मिटणार
### अर्जानंतर १५ दिवसात होणार मोजणी

सुराज्य/चिखली

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस सरकार आता जनतेच्या हिताचे निर्णय घेत असून एक जुलैनंतर शेतकऱ्यांच्या भूमिअभिलेख कार्यालयात रखडलेल्या शेतजमिनीच्या मोजण्या विनाविलंब १५ दिवसांच्या आत सॅटेलाईटच्या माध्यमातून होणार असल्याने याची उत्सुकता आता मोहोळ तालुक्यातील शेतकरी बांधवांना लागली आहे.**

आधुनिक पद्धतीने नवीन तंत्रज्ञानाच्या आधारे या शेतजमीन मोजणी होणार आहे. शेतकऱ्यांनी जमिनीची मोजणी केल्यानंतर झालेल्या खुणाखुणा काढून टाकणे, वारंवार जमिनीची मोजणी करावी लागणे यासह मोजणीशी निगडित वादाचे प्रकार आता थांबणार आहेत. भूमिअभिलेख अर्थात मोजणी विभागाने आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरत सरकारने रामबाण उपाय शोधला आहे. यातून जमिनीची सॅटेलाईटच्या माध्यमातून मोजणी होणार असून, यामुळे मोजणीच्या वेळेत निम्म्याने बचत होणार आहे. शेतकऱ्यांना आता अक्षांश व रेखांशासह मोजणी नकाशेही मिळणार असून मोजणीसाठी शेतकऱ्यांची होणारी त्रेधातिरपीट थांबणार आहे. विविध क्षेत्रात नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर वाढला जात असतानाच जमीन मोजणीच्या प्रक्रियेतही त्याचा अंतर्भाव दिसून येत आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांना जमीन मोजणीच्या कामासाठी खोळंबा होणार नसून जमीन मोजणीसाठी अर्ज दिल्यानंतर किमान १५ दिवसांत ही मोजणी केली जाणार आहे. नवीन तंत्रज्ञानामुळे वेळेची बचत होवून काटेकोरपणे ही मोजणी होणार असल्यामुळे शेतकऱ्यांच्या बांध कोराकोरी व वादविवादाला या मोजणीतून पूर्णविराम मिळणार आहे.



## चिखलीच्या जिल्हा परिषद शाळेत शाळा पूर्व तयारी मेळावा उत्साहात

**चिखली** : दिनांक २७ एप्रिल रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिखली (ता. मोहोळ) येथे शाळा पुर्व तयारी मेळावा उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य , शाळा व्यवस्थापन समिती, तसेच इयत्ता पहिलीत दाखल होणाऱ्या मुलांचे पालक व ग्रामस्थ उपस्थित होते . यावेळी गावातून लेझीम खेळत विद्यार्थ्यांनी प्रभातफेरी काढली. इ.१ली मध्ये दाखल होणाऱ्या मुलांचे फुगे, टोपी, शालेय साहित्य, खाऊ देऊन स्वागत करण्यात आले. मुलांच्या शारीरिक, बौद्धिक, सामाजिक आणि भावनात्मक, भाषा विकास व गुणनपूर्व तयारी साठी आवश्यक कृतींचा सराव घेण्यात आला.शेवटी सहभागी स्वयंसेवक यांना प्रमाणपत्र व विद्यार्थ्यांना अल्पोपहार वाटप करून मेळावा संपन्न झाला .या मेळाव्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक तसेच शिक्षक, शिक्षीका यांनी अतोनात परिश्रम घेऊन मेळावा यशस्वी केला. त्यावेळी शालेय परिसर मोठ्या प्रमाणात सजवण्यात आला होता.

## मातोश्री वृद्धाश्रमाचा पाचवा वर्धापन दिन साजरा

**सांगोला** : मातोश्री वृद्धाश्रमाला जागा उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न सुरु असून लवकरच जागेचा प्रश्न मार्गी लागेल असे सांगोला सूतगिरणीचे अध्यक्ष डॉ. प्रभाकर माळी यांनी सांगितले. लोकसेवा बहुउद्देशीय संस्था कडलास (सावंतवाडी) संचलित मातोश्री वृद्धाश्रम सांगोलाचा पाचवा वर्धापन दिन नुकताच मान्यवरांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला, त्यावेळी डॉ. माळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. प्रारंभी प्रास्ताविक करताना संस्था अध्यक्ष राहुल जाधव यांनी सांगितले की, सध्या वृद्धाश्रमाचे कार्य हे सर्व देणगीदारांच्या सहकार्यावरच चालू असून यापुढेही दानशूर अशा देणगीदारांची गरज आहे तेव्हा समाजातील विविध दानशुरांनी या मातोश्री वृद्धाश्रमाला विविध प्रकारची मदत करावी असे आवाहन केले. यावेळी बोलताना फास्ट न्यूज चे संपादक अशोक पवार म्हणाले की, या वृद्धाश्रमाला हक्काचा निवारा हवा आहे. यासाठी सर्वांनी सहकार्य करावे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गाडेकर सर व आभार सी. ए.जुबेर मुजावर यांनी मानले. या कार्यक्रमाला डॉ. शैलेश डोंबे, दत्तात्रय पांचाळ सर वंदनाताई पाटील, आदी मान्यवरांसह संस्थेचे सचिव अशोक जाधव, खजिनदार सुवर्णा जाधव, दादा खडतरे, उद्योगपती रमेश माळी, मिलिंद गायकवाड, बाळासाहेब बनसोडे, मानाजी गायकवाड, निलेश चव्हाण, शुभांगी चव्हाण, राणीताई चव्हाण व इतर सहकारी उपस्थित होते.



## माऊली विद्यालयाच्यावतीने वडाळा येथे वृक्षारोपण

**उत्तर सोलापूर** : वडाळा येथील माऊली महाविद्यालय,राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सोलापूर -बार्शी रोडवरील वडाळा गावालगत गुरुवारी वृक्षारोपण करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बळीरामकाका साठे, डॉ.अनिल कुलकर्णी, संस्थेचे संचालक हरिभाऊ घाडगे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. काकांच्या मार्गदर्शनाखाली वडाळा या गावाच्या परिसरात व महाविद्यालय परिसरात अनेक ठिकाणी केलेल्या वृक्षारोपणामुळे परिसर नंदनवन बनलेला आहे. यावेळी एकूण १५० सागाची झाडे लावण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. दत्तात्रय हरवाळकर, डॉ. विकास शिंदे, डॉ. प्रमोद पाटील, प्रा. बाळासाहेब वाघचवरे, प्रा. बालाजी गंगावणे, प्रा. परमेश्वर हटकर, डॉ. परमेश्वर सूर्यवंशी, डॉ. सतीश घोरपडे, प्रा. एस. के. देशमुख, डॉ. प्रतिभा बिरादार व इतर सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



## तिऱ्हे म्हसोबा यात्रेनिमित्त घंटागाडीचे लोकार्पण

**उत्तर सोलापूर** : माझं गाव स्वच्छ गाव,घण कचरा व्यवस्थापन, स्वछ भारत मिशन योजनेतून श्री म्हसोबा यात्रेच्या पूर्व संध्येला घंटागाडीचे लोकार्पण करण्यात आले. ग्रामदैवत श्री म्हसोबा यात्रेला शुक्रवार पासून सुरुवात होणार आहे. त्यानिमित्ताने संपूर्ण मोहोळ, उत्तर व दक्षिण मधील भक्त भाविक दर्शनासाठी येतात. उदर निर्वाह साठी बाहेर गावी गेलेली कुटुंबही या निमित्ताने येतात. कचरा व्यवस्थापन करणे अवघड होतं असल्याने, स्वच्छता अबाधित ठेवण्यासाठी एक मताने निर्णय घेण्यात आला. यावेळी सरपंच नेताजी सुरवसे, सोसायटी चेअरमन भास्कर सुरवसे,उपसरपंच मारुती लवटे, अजय सोनटक्के, गोवर्धन जगताप, शिवाजी सुरवसे, हंसध्वज जाधव, पार्थवीर सुरवसे, शिवाजी जाधव, सुभाष वसपटे, दामोदर पिसे, संजय राठोड गुरुदेव गायकवाड भागवत गायकवाड खराडे गोविंद सुरवसे उमेश सोनटक्के,गायकवाड उपस्थित होते.

## मृत्यूस कारणीभूत; कारचालकविरुद्ध गुन्हा

**सोलापूर** : मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी एका कारचालकविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पांडुरंग नारायण वाकसे (वय-३९,रा.सलगर वस्ती डोणगाव रोड) यांचा मोठा भाऊ बालाजी नारायण वाकसे हा दुचाकीवरून (एमएच.१३. डीएल.०५३०) जात असताना सोलापूर मंगळवेढा रस्त्यावरील वानकर वस्ती जवळ कारने (एमएच.१३.डीजे.०५५०) त्याला धडक दिली. यात बालाजी वाकसे यांच्या मृत्यू झाला आहे.ही घटना २२ एप्रिल रोजी घडली. पुढील तपास पोसई मंद्रूपकर हे करीत आहे.

# मजबूत पकड ठेवत पुन्हा विद्यमान सत्ता प्रस्थापित होईल

## मोहोळच्या नागनाथ महाराज यात्रेतील भाकणूक

सुराज्य/मोहोळ

**देशाच्या राजकारणात जरी कोणी आले गेले तरी आपली पकड मजबुत ठेवत विचार मंथन होऊन पुन्हा शांततेत विद्यमान सत्ता प्रस्थापित होईल अशी भाकणुक मोहोळचे ग्रामदैवत श्री सदगुरु नागनाथ यात्रेत केली. श्री नागनाथ महाराजांच्या यात्रेचे प्रमुख आकर्षण असणाऱ्या गण दि २६ एप्रील रोजी भर दुपारी चार वाजता पालखीसह गणाची सवाद्य मिरवणुक काढण्यात आली. त्यापूर्वी श्री नागनाथ देवस्थानचे मुख्य मानकरी राजेंद्र खर्गे महाराज यांच्यात वायु रूपाने संचार होवून पालखीसह सवाद्य साकी व अभंगाच्या माध्यमातून जयघोष करित मिरवणुक निघाली.**




मोहोळ हे गाव पुण्य भुमीठाव! दैवतांचे नाथ नागेश्वर !! असा जयघोष करित हजारों नागेश भक्तांनी खर्ग तीर्थावर नागनाथांचा वायुरूप संचार ज्यांच्या अंगात होतो असे मानकरी प.पू राजेन्द खर्गे महाराज व हेग्रसांचे वंशज विनायकराव तथा अरूणबुवा मोहोळकर यांचा गुरु शिष्य भेटींचा नयनरम्य सोहळा पाहण्यासाठी हजारो भावीकांनी ऐन उन्हात मोठी गर्दी केली होती. प्रारंभी दिल्ली दरवाजात देशाच्या राजकारणाची भाकणूक होते. या भाकणूकींकडे संपूर्ण राज्याचे लक्ष असते. देशाच्या राजकारणात जरी कोणी आले गेले तरी पकड मजबुत ठेवत विचार मंथन होऊन पुन्हा शांततेत विद्यमान सरकार चींच सत्ता प्रस्थापित होईल असे सांगत खर्ग डोहासह, काकडे पार, मुंगीचा धोडा येथे सांगण्यात आलेल्या भाकणुकीत यंदा पाऊस समाधानकारक नसुन चारा महाग होईल असे सांगत रोगराई काही काळ होणार असुन पेरणी अडखळत असल्याची भाकणुक खर्गे महाराजांनी केली. पालखीसह गणाची निघालेली मिरवणुक मंदिरात पोहचल्यानंतर महाआरती झाली. मोहोळसह पंचक्रोशीतील असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या श्री नागनाथ देवस्थानच्या यात्रेत दि २५ एप्रील रोजी भिंकलिंग आप्पा महाराजाच्या भेटीला श्री नागनाथाची पालखी सह मिरवणुक होऊन रात्री नयनरम्य शोभेचे दारु काम पार पडले. दि. ३० एप्रील रोजी श्रीचे तेल उतरविण्याच्या कार्यक्रमानंतर यात्रेची सांगता होणार आहे .

भर उन्हात आलेल्या भावीकाना इलियास भाई शेख मित्र परिवार व मुस्लीम समाजाच्या वतीने लोकराज्य युवा मंडळ, हरिओम मित्र मंडळ, गोडसे परिवार, पोस्टमन बागवान जमियात बगवान चौक प्रभाकर कुलकर्णी आदिंसह अनेक सामाजीक संघटनेच्या माध्यमातुन सरबत, मठ्ठा व थंड पाण्याची सोय जागोजागी करण्यात आली होती. यावेळी नागनाथ देवस्थान कमिटीचे अध्यक्ष प्रकाश देशमुख, उपाध्यक्ष विष्णुपत गायकवाड, पदमाकर देशमुख, राजेंद्र कुर्डे, विश्वस्त सुरेश घोंगडे, अशोक गायकवाड, माजी अध्यक्ष सूर्यकांत कांचन, माजी प्राचार्य दिलीप देशपांडे, गोविंद घागरे, मोहन काकडे, सुरेश राऊत, अभिनंदन गुमते, बाळासाहेब शिंदे, भाऊसाहेब गायकवाड, संपत मोहोळकर, सयाजीराव देशमुख, सतीश गरड, ओंकार देशमुख, उल्हास वाले, प्रशांत गायकवाड, विजयकुमार स्वामी ॲड. देशमुख, धनंजय कारंजकर यांच्यासह पंचकमेटीचे सदस्य व भक्तानी परिश्रम घेतले.

## शहरातील रस्त्यांच्या दुरावस्थेचा प्रश्न मार्गी लावावा : लोखंडे

सुराज्य/सांगोला

भुयारी गटारी योजनेच्या नावाखाली रस्त्यावरील खड्डे बुजवले जात नाहीत. शहर व उपनगरातील रस्त्यांची चाळण झाली आहे. शहरांतर्गत रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडल्यामुळे याचा नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. या प्रकारामुळे नागरिकांमधून तीव्र संतप्त प्रतिक्रिया उमटत असून सर्वसामान्य नागरिकांच्या मागणीनुसार सांगोला नगरपालिकेने आता रस्त्याची नुसती मलमपट्टी करू नये, तर डांबरीकरण करून शहरातील रस्त्याच्या दुरावस्थेचा प्रश्न मार्गी लावावा. अशी आग्रही मागणी माजी नगरसेवक तथा गटनेते सचिन लोखंडे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.



सांगोला शहरातील प्रमुख रस्ते व मिरवणूक मार्गाच्या रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी. यासाठी नगरसेवक सचिन लोखंडे यांनी नगरपरिषद कार्यालयाकडे वारंवार पत्रव्यवहार करून रस्त्याच्या दुरुस्ती बाबत मागणी केली आहे. नगरपरिषद कार्यालयाकडून या मागणीवर आतापर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नाही. परिणामी शहरातील नागरिकांकडून व जयंती उत्सव मंडळांकडून सदर रस्त्याच्या दुरुस्तीबाबत सांगोला नगरपालिकेकडे मागणी लावून धरल्यानंतर नगरपालिकेने केवळ खड्ड्यात माती आणि मुरूम टाकून मलमपट्टी करण्याचा प्रयत्न केला परंतु हा प्रयत्न आवघ्या काही दिवसातच फोल ठरला. पुन्हा खड्डे उघडे झाल्याने शहरवासीयांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

प्रामुख्याने सांगोला शहरातील पंढीत नेहरू चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, शनी गल्ली ते वेसीपर्यंत, देशपांडे गल्ली ते कुमठेकर घर, शिदोबा मंदिर ते छत्रपती शिवाजी महाराज चौक, भोपळे रोड ते महात्मा फुले चौक, स्टेशन रोड ते नगरपालिका या मार्गावरील रोड मोठ्या प्रमाणात खराब झाले आहेत. या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत शहरातील सर्व जाती धर्माचे सण उत्सव व सर्व महापुरुषांच्या जयंती उत्सव मिरवणुका याच मार्गाने जातात. तसे शहराच्या मध्यभागातून जाणारा प्रमुख मार्ग असल्याने या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात रहदारी असते. या खड्ड्यामुळे वाहनधारकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. तसेच शहरातील महापुरुषांच्या मिरवणुका करताना या पडलेल्या खड्ड्यामुळे नागरिकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. मोठ्या प्रमाणात व्यापाऱ्यांची गैरसोय होत आहे. त्यामुळे सांगोला नगरपरिषद कार्यालयाने सदर रस्त्यावर आता नुसती मलमपट्टी न करता रस्त्यांचे डांबरीकरण करावे. अशी मागणी करण्यात आली आहे

## रेशन कार्डच्या समस्यांचे निवारण होणार : सातपुते

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीवसह चांदापुरी, पठाण वस्ती, कुसमोड, झिंजेवस्ती, सुळेवाडी, काळमवाडी, बचेरी, शिंगोर्णी आदि गावातील अनेक लोकांच्या रेशन कार्डबाबत विविध समस्या आहेत. या समस्यांचे निवारण न झाल्या अनेक लोक स्वस्त धान्य दुकानातून मिळत असलेल्या अन्नधान्या पासून वंचित असल्याचे पहावयास मिळत आहे.



हे लक्षात येताच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे तालुका उपाध्यक्ष रणजीत सातपुते यांनी विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून शनिवार दिनांक २९ एप्रिल २०२३ रोजी माळशिरस तालुक्याचे प्रभारी तहसीलदार तुषार देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली जीर्ण झालेले रेशनकार्ड नवीन करून देणे, रेशन कार्ड मध्ये नवीन नाव समाविष्ट करणे, रेशन कार्ड मधील नाव रद्द करणे किंवा नावात बदल करणे यांसह विविध समस्यांचे निवारण करण्यासाठी पिलीव येथील श्री स्वामी समर्थ हॉटेलच्या पाठीमागे आर्वे कॉम्प्लेक्समध्ये प्रज्ञा ई-सेवा केंद्र येथे रेशन कार्ड समस्यांचे निवारण या शिबिराचेआयोजन केले आहे. तरी पिलीवसह पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी या शिबिरास उपस्थित राहून आपल्या रेशन कार्ड बाबत असलेल्या समस्यांचे निवारण करून घ्यावे असे आवाहन रिपाईचे तालुका उपाध्यक्ष रणजीत सातपुते यांनी माध्यमांद्वारे केले आहे.



## महादेव कोगनुरे यांच्या हस्ते डॉजबॉल अजिंक्य स्पर्धेचे बक्षीस वितरण

सुराज्य/अक्कलकोट

डॉजबॉल असोसिएशन सोलापूर, एम के फाउंडेशन व पार्थ कला क्रीडा शैक्षणिक बहुउद्देशीय संशोधन संस्था सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित दुसऱ्या सीनियर राज्यस्तरीय अजिंक्य स्पर्धेचे बक्षीस वितरण एम.के. फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष मा.श्री.महादेव कोगनुरे यांच्या हस्ते मोठा उत्सव वातावरणात संपन्न झाला .

याप्रसंगी एम.के. फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष महादेव कोगनुरे यांनी विजेत्या संघाचे व खेळाडूंचे अभिनंदन केले, स्पर्धा म्हटली जय पराजय ह्या गोष्टी होतच असतात, ज्यांच्याकडून सर्वोत्तम खेळ होईल तो विजेता होणारच, पण ज्यांना स्पर्धेत यश नाही मिळालं अश्या खेळाडूंनी खचुन न जात पुन्हा नव्या जोमाने तयारीला लागून जिद्दीने आपले सर्वोत्तम देण्याचा प्रयत्न करावा'' असे मनोगत व्यक्त केले.

यावेळी कार्यक्रमास अध्यक्ष वैजनाथ हत्तुरे, डॉजबॉल असोसिएशन महाराष्ट्राचे अध्यक्ष जवान सिंग राजपूत, सोलापूर शहर व जिल्हा डॉजबॉल असोसिएशनचे दर्यापा हत्तुरे, सत्यम जाधव तसेच या अजिंक्य स्पर्धेचे सूत्रधार व सचिव प्राध्यापक संतोष खेंडे, व्यासपीठावर असलेले सर्व प्रमुख मान्यवर उपस्थित होते. आणि राज्यभरातून आलेले खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते..

## टेंभुर्णी बसस्थानकात २ महिला चोरांना अटक

**सोलापूर** :सोलापूर-टेंभुर्णी येथील बस स्थानकात बसमध्ये प्रवेश करणाऱ्या एका महिलेच्या पर्समधून १३ हजाराची रक्कम चोरताना दोन महिलांना पोलिसांनी अटक केली.

ही घटना बुधवारी दुपारच्या सुमारास घडली. पूजा प्रकाश जोशी (वय ४२) आणि फातिमा सलीम शेख (वय ४४ दोघी रा.होम मैदान सोलापूर) अशी महिला चोरांची नावे आहेत. काल दुपारी १२ वाजेच्या सुमारास सुवर्णा उमाकांत वाघमारे (रा.बारलोणी ता.माढा) या आपल्या नातेवाईकांसह टेंभुर्णी बस स्थानकात अकलूज येथे जाणाऱ्या बस मध्ये प्रवेश करीत होत्या. त्यावेळी जोशी आणि शेख या दोघी महिलां त्यांच्या पर्समधील १३ हजार रुपये रोख असलेली पाकिट पळवली. नातेवाईकांना संशय आल्याने पाकिट खाली टाकून पळून जाण्याचा प्रयत्न केला.त्यावेळी त्यांना पकडून टेंभुर्णी पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. पोलिसांनी दोघींवर गुन्हा दाखल केला.

## वेळापूरच्या बृहन्मठाधिपती शिवराज स्वामींचा पट्टाभिषेक

**वेळापूर** : वेळापूर येथील श्री बृहन्मठाच्या मठाधिपती होटगीचे श्री वेदमूर्ती शिवराज स्वामी यांचा पट्टाभिषेक सोहळा श्री शैल पीठाचे श्री श्री श्री १००८ सूर्यसिंहासनाधिश्वर डॉ चन्नसिध्दराम पंडीताराध्य शिवाचार्य महास्वामी व काशी पीठाचे श्री श्री श्री १००८ ज्ञानसिहांसनाधिश्वर डॉ मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामी यांच्या सानिध्यात व असंख्य शिवभक्तांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साही व भक्तिमय वातावरणात पार पडला .

या भव्य पट्टाभिषेक महोत्सवाच्या निमित्ताने वेळापूर येथील मठाच्या परिसरात शनिवार दि.२२ ते गुरुवार दि.२७ एप्रिल दरम्यान वेळापूर मठाचे श्री.ष.ब्र. शिवाचार्य शिरोमणी सदगुरु मुक्तेश्वर शिवाचार्य यांच्या गुरुत्वाखाली विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दि.२२ रोजी गुरुगादीस रुद्राभिषेक व रुद्रहोम करण्यात आला. दि.२३ रोजी ग्रामस्वच्छता, दि.२४ रोजी वृक्षारोपण, दि.२५ रोजी रक्तदान, दि.२६ रोजी श्री शैल व श्री काशी जगद्गुरु यांचा भव्य अड्डपालखी सोहळा काढण्यात आला. दि.२७ रोजी शिवराज स्वामी यांना अभिषेक व पट्टाभिषेक सोहळा साजरा करण्यात आला. शिवराज स्वामी यांना वेळापूर बृहन्मठाचे मठाधिपती म्हणून गौरवण्यात आले व आर्शीर्वाद देण्यात आले. महोत्सवाच्या निमित्ताने दररोज सायंकाळी धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. दि.२७ रोजी सायंकाळी नूतन मठाधिपती शिवराज स्वामी यांची वेळापूर नगरीतून सवाद्य हत्तीवरून भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणूकीत हजारो शिवभक्त सहभागी झाले होते.



# माझे वाढते वय पाहता, यंदाची निवडणूक ही अखेरची : आ.पाटील

सुराज्य/अक्कलकोट

**माझे वाढते वय पाहता, यंदाची निवडणूक ही अखेरची असून मी यापूढे निवडणूक लढवणार नाही. मात्र सज्जन लोकांच्या पाठीशी राहाऊन दुर्जन गोल्डन गँगला माझा शेवटच्या श्वासापर्यंत विरोध कायम असणार आहे अशी घोषणा माजी आ.सिद्रामप्पा पाटील यांनी केली.**

मी वयाच्या १६ व्या वर्षांपासून सतत संघर्ष करत अन्याय विरुद्ध लढत आलो आहे. माझ्या जीवनात गद्दारापेक्षा चांगले लोक अधिक भेटले ते गोरगरीब घटकातील आहेत. मूठभर गद्दारानी मात्र माझ्याजवळ राहाऊन प्रत्येक निवडणूकित मलाच धोका देण्याचा काम केलेले आहेत. त्यांचे नाव आहे गोल्डन गँग, केवळ सर्वसामान्य लोकांच्या मदतीने नेहमी सर्वच क्षेत्रात मी सुरक्षित राहिलेले आहे. माझे वय सध्या ८५ वर्ष असून वयोमानानुसार अडचणी निर्माण होत आहेत. यामुळे मी यापुढील काळात कोणतेही निवडणूक लढवणार नाही. यंदाची बाजार समिती निवडणूक अखेरची असणार आहे. यासाठी मागील अनेक वर्षापासून माझ्या सोबत निष्ठेने राहिलेले लोक आजही राहतील असा विश्वास पाटील यांनी व्यक्त केले. काही मिनी नेते राजकिय पदासाठी नसून निवडणूकित सतत आर्थिक डल्ला मारण्यासाठी प्रयत्नवादी असतात. तब्बल १५ वर्षे भाजप म्हणून माझ्या सोबत राहाऊन मलाच धोका देत पैसे कमवण्याचे देण्याचा काम केले आहेत. असे आरोप सिद्रामप्पा पाटील यांनी केले.



यावेळी पत्रकार परिषदेत श्रीमंत कुटोंजी, राजकुमार बंदिछोडे, संजय पाटील, आप्पासाहेब पाटील, विश्वनाथ भरमशेट्टी, मल्लिनाथ दुलंगे, विश्वनाथ दोड्याळे, आदी जण उपस्थित होते.

**मल्लिकार्जुन पाटील म्हणजे राजकीय सौदाचा सौदागर आहेत. मागील अनेक वर्षांपासून नागरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती आशा विविध निवडणूकित एखादा उमेदवार निवडून आणायचे आणि त्याचे सौदा करून पैसे कमवायचे हा त्यांचे धंदा तालुक्याला सर्वस्तृत आहे. नागरपालिक निवडणूकित २५ लाखाला स्वामी नावाच्या नगरसेवकाला विक्री केले. ते पैसे हडप केले. दोन पिढ्या पासून प्रामाणिक राहिलेल्या स्वामींचे सुद्धा इन्कम सोडले नाहीत. राजकीय परिस्थिती पाहवून कधी भाजप, कधी राष्ट्वादी तर कधी काँग्रेस असे सतत दलबदलु लोकांनी आम्हाला राजकीय निष्ठा शिकवू नये असा आरोप जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष पाटील यांनी केले.**

**- शिवानंद पाटील**



# मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी अजित पवारांचे पत्र

**सुराज्य/मुंबई : येत्या महाराष्ट्र दिनी मराठी भाषेला अभिजा भाषेचा दर्जा देण्याची घोषणा करावी, अशी मागणी राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केली आहे. अजित पवारांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना यासंदर्भातील पत्र लिहिले आहे.**

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठीचा लढा दशकाहून अधिक काळ सुरु आहे. अभिजात भाषेसाठीचे सर्व निकष मराठी भाषा पूर्ण करत असल्याचे पुरावे तसंच त्यासंदर्भातील तपशीलवार अंतरिम अहवाल महाराष्ट्राच्यावतीने २०१३ मध्ये केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाकडे व २०१४ मध्ये अंतिम निर्णयासाठी केंद्रसरकारकडे पाठवण्यात आला. तेव्हापासून सातत्याने पाठपुरावा सुरू आहे, असं अजित पवार पत्रात म्हणाले.

# आयुर्वेद-ॲलोपॅथी डॉक्टरांचे काम भिन्न

## सर्वोच्च न्यायालयाची टिप्पणी, समान वेतनाचा आदेश रद्द

सुराज्य/नवी दिल्ली

**शासकीय रुग्णालयांमध्ये काम करणारे आयुर्वेद डॉक्टर हे ॲलोपॅथी डॉक्टरांच्या समकक्ष नसल्याचे स्पष्ट करत दोघांना समान वेतन लागू करण्याचा गुजरात उच्च न्यायालयाचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी रद्दबातल केला. ॲलोपॅथी डॉक्टरांप्रमाणे गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया आणि आपत्कालीन सेवा आयुर्वेदाच्या डॉक्टरांना द्याव्या लागत नाहीत, असे न्यायालयाने स्पष्ट केले.**

आयुर्वेद व्यावसायिक हे एमबीबीएस पदवीधारक डॉक्टरांच्या समकक्ष मानले जाण्यास पात्र आहेत, असा आदेश गुजरात उच्च न्यायालयाने २०१२ मध्ये दिला होता. त्यास आव्हान देणाऱ्या याचिकांवरील सुनावणीअंती सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी निकाल दिला. आयुर्वेद व्यावसायिकांचे महत्त्व आणि पर्यायी किंवा स्वदेशी औषध पद्धतीला प्रोत्साहन देणे महत्त्वाचे असले तरी दोन्ही श्रेणींतील डॉक्टर समान वेतनास पात्र ठरण्यासाठी सारखे काम नक्कीच



करत नाहीत, या वस्तुस्थितीकडे आपण दुर्लक्ष करू शकत नाही, याचा उल्लेख न्यायालयाने केला. दोन्ही पद्धती ज्या उपचार विज्ञानाचा अवलंब करतात त्यांच्या स्वरूपामुळे आणि आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे ॲलोपॅथी डॉक्टर आकस्मिक कामे करण्यास सक्षम आहेत. त्यांनाच गंभीर जखमींवर तातडीचे उपचार करावे लागतात. ते आयुर्वेदिक डॉक्टर करू शकत नाहीत', असे असे न्या. व्ही. रामसुब्रह्मण्यम व न्या. पंकज मित्तल यांच्या खंडपीठाने नमूद केले. एमबीबीएस पदवीधारक डॉक्टर हे गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया करणाऱ्या शल्यविशारदांना (सर्जन) जशी मदत करू शकतात, तसे करणे आयुर्वेदिक डॉक्टरांना शक्य नाही, याचाही खंडपीठाने उल्लेख केला.

> शहरांमधील सामान्य रुग्णालयांमध्ये बाह्यरुग्ण विभागात ॲलोपॅथीच्या डॉक्टरांना दिवसाला शेकडो रुग्णांवर उपचार करावे लागतात, तसे आयुर्वेद व्यावसायिकांना करावे लागत नाहीत, असेही खंडपीठाने म्हटले आहे. आयुर्वेद आणि पर्यायी किंवा स्वदेशी औषध पद्धतीला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे, हे मान्य. मात्र, दोन्ही श्रेणींतील डॉक्टर एकसारख्या वेतनास पात्र ठरविण्यासाठी समान पद्धतीचे काम करत नाहीत, या वस्तुस्थितीकडे आपण दुर्लक्ष करू शकत नाही.
>
> \- सर्वोच्च न्यायालय.


### केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय

# देशभरात १५७ नवी सरकारी परिचारक महाविद्यालये

सुराज्य/नवी दिल्ली

**देशभरात १५७ नवी सरकारी परिचारक (नर्सिंग) महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय बुधवारी केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतला. जिथे वैद्यकीय महाविद्यालये असतील तिथेच ही महाविद्यालये उभी केली जाणार असून प्रत्येक नव्या परिचारक महाविद्यालयासाठी केंद्र सरकार १० कोटींचे अर्थसाह्य करेल, अशी माहिती केंद्रीय आरोग्यमंत्री मनसुख मांडविय यांनी पत्रकार परिषदेत दिली.**

नव्या परिचारक महाविद्यालयांमधून दरवर्षी १५ हजार ७०० अतिरिक्त परिचारक देशाच्या आरोग्य सेवेसाठी उपलब्ध होतील. २०१४ नंतर ४ टप्प्यांमध्ये १५७ वैद्यकीय महाविद्यालये सुरू केली होती. त्यांच्या पायाभूत सुविधांचा उपयोग परिचारक महाविद्यालयांसाठी होऊ शकेल. देशभरात १ लाख ६ हजार वैद्यकीय जागा उपलब्ध आहेत पण, बीएससी नर्सिंगच्या पदवीसाठी केवळ १ लाख १८ हजार जागाच उपलब्ध आहेत. देशभर नवनवीन सरकारी रुग्णालये सुरू होत असल्यामुळे बीएससी नर्सिंगची पदवी घेणाऱ्या परिचारकांची मागणी वाढू लागली आहे. त्या तुलनेत जागांची उपलब्धता कमी आहे, असे मांडविय म्हणाले.



### विजयाची नशा

## दिल्लीच्या खेळाडूंचे महिलेसोबत अश्लील वर्तन

सुराज्य/दिल्ली : दिल्ली कॅपिटल्स संघाच्या अडचणी कमी व्हायचे नाव घेत नाहीत. आयपीएल सुरु होण्याआधी ऋषभ पंत दुखापतग्रस्त झाला. त्यानंतर संघाला एकापाठोपाठ एक पराभाचा सामना करावा लागला. तळाशी असलेल्या दिल्ली संघाला टीकेचा सामना करावा लागत आहे. दिल्लीला पहिल्या सात सामन्यात फक्त दोन विजय मिळवता आले आहेत. अशातच दिल्लीच्या स्टार खेळाडूने पार्टीमध्ये महिलेसोबत अश्लील वर्तन केल्याचे समोर आले आहे. रिपोर्ट्सनुसार, हैदराबादवरील विजयानंतर झालेल्या पार्टीत एका स्टार खेळाडूने पार्टीमध्ये महिलेसोबत अश्लील वर्तन केलेय. त्यामुळे दिल्ली कॅपिटल्सने खेळाडूंसाठीच्या नियमात बदल केला आहे. या घटनेनंतर दिल्ली फ्रेंचायजीने नवीन निर्बंध घातले आहेत.

# जमिनी आमच्या, इमले तुमचे, चालणार नाही

## आम्हाला हा प्रकल्प नको : उद्धव ठाकरे

सुराज्य/मुंबई

**'बारसूवरुन सध्या रान पेटवलं जातंय. बारसूसाठी उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांनीच पत्र दिलं, असं सांगितलं जातंय. पण मी हे नाकारतच नाही. मी कुठे नाही म्हणतोय. मी मुख्यमंत्री असताना अडीच वर्षे तेथील स्थानिकांवर तुमच्यासारखी अशी जोर जबरदस्ती केली नव्हती, असं सांगतानाच बारसूचा प्रकल्प पर्यावरणाला हानी करणारा आहे, तो प्रकल्प आम्हाला नको, असं ठामपणे उद्धव ठाकरे यांनी सांगितलं.'**




भारतीय कामगार सेनेच्या ५५ व्या सर्वसाधारण सभेला उद्धव ठाकरे यांनी संबोधित केलं. यावेळी संघटनेच्या मुख्य सल्लागारपदी उद्धव ठाकरे यांची एकमताने निवड करण्यात आली तर अध्यक्ष म्हणून खासदार अरविंद सावंत यांची निवड करण्यात आली. भारतीय कामगार सेनेच्या कारकिर्दीत विविध नेत्यांनी दिलेल्या योगदानाचा उद्धव ठाकरे यांनी आढावा घेतला. यावेळी खास करुन अरविंद सावंत यांच्या पाठीवर उद्धव ठाकरे यांनी कौतुकाची थाप मारली. विविध विषयांवर मतं व्यक्त करताना प्रामुख्याने बारसूबद्दलचं ठाकरे गटाच्या मतांचं धुकं उद्धव ठाकरे यांनी हटवून रोखठोक भूमिका स्पष्ट केली.

हे सरकार संवेदनशील नाही. लोकांच्या भल्याचं यांना काही पडलेलं नाही. पोलिसांकरवी अत्याचार सुरु आहे. कामगारांना गार करण्याचं यांचं धोरण आहे. त्यामुळेच मला समाजातला अन्याय जाळून टाकायचाय, पक्षचिन्ह गेल्यावर मशाल चिन्ह मी उगाच घेतलं नाही, असंही उद्धव ठाकरे यांनी आवर्जून सांगितलं.

> **आम्हाला हा प्रकल्प नको : उद्धव ठाकरे**
>
> मी मुख्यमंत्री असताना बारसूबाबत पत्र दिलं होतं पण स्थानिकांशी गद्दारी केली नाही. मी तुमच्यासारखी स्थानिकांवर जबरदस्ती केली नाही. पर्यावरणाला हानी करणारा प्रकल्प आम्हाला नको. जर स्थानिकांच्या भल्याचा प्रकल्प असेल तर लोकांवर जबरदस्ती का करण्यात येतीये? असा सवाल करुन जमीन आमचे, इमले तुमचे हे कसे चालेल? असा परखड प्रश्न उद्धव ठाकरे यांनी विचारला. तसेच मूळ मालकांकडून जमिनी दलालांच्या ताब्यात गेल्या आहेत, त्यामुळे दलालांच्या होकाराला नागरिकांचा होकार समजू नका, असंही उद्धव ठाकरे यांनी सुनावलं. प्रकल्पाबाबतचं सत्य लोकांना कळलं पाहिजे, असंही ते म्हणाले.

# मुंबई-पुणे महामार्गावर ११ वाहने एकमेकांवर आदळली




सुराज्य/पुणे

मुंबई-पुणे महामार्गावरील अपघातात गेल्या काही दिवसांपासून वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे. वाहन चालक नियम मोडत वाहन चालवत असल्याने या महामार्गावर अपघातात वाढ झाल्याचे सांगण्यात येत आहे. गुरुवारी (ता. २७ एप्रिल) मुंबई-पुणे महामार्गावर खोपोलीजवळ एक विचित्र अपघात घडल्याची माहिती समोर आली आहे. या अपघातात एकूण ११ वाहने एकमेकांना धडकली. खोपोली एक्झिटजवळ हा अपघात घडला आहे. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावर झालेल्या या अपघातात चार महिला जखमी झाल्या असल्याचे सांगण्यात आले आहे. पुणे-मुंबई महामार्गावरील बोरघाटात गेल्या काही दिवसांत बऱ्याच अपघातांची नोंद करण्यात आली आहे. गुरुवारीदेखील बोरघाट उतरत असताना हा अपघात झाला आहे. खोपोलीच्या एक्झिटजवळ ट्रक चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने हा विचित्र अपघात घडला. यामध्ये ट्रकने एक-दोन नाही तर तब्बल ११ वाहनांना धडक दिली.

या घटनेनंतर ट्रक चालक घटनास्थळावरून पसार झाल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे रायगड पोलिसांकडून फरारी वाहन चालकाचा शोध घेण्यात येत आहे. बोरघाटाच्या उतारावर हा अपघात घडल्याने यामध्ये मोठ्या संख्येने वाहनांचे नुकसान झाले असल्याची माहिती समोर आली आहे तर जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.

# हसन मुश्रीफांचा दिलासा कायम

सुराज्य/नवी दिल्ली

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते हसन मुश्रीफ यांना उच्च न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला आहे.

पुढील सुनावणी होईपर्यंत ईडीने मुश्रीफ यांना अटक करु नये, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे त्यांना अटकेपासून संरक्षण देण्यात आले आहे.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी सत्र न्यायालयाने त्यांचा अटकपूर्व जामीन नाकारला होता. त्यानंतर हसन मुश्रीफ यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

### 'कार्गो टर्मिनल'ची भरारी

# पुण्यातून मालवाहतुकीला मिळणार चालना

सुराज्य/पुणे

लोहगाव येथील पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर नव्याने उभारण्यात येणाऱ्या 'कार्गो टर्मिनल'चे ९५ टक्के काम पूर्ण झाले आहे.

'ब्यूरो ऑफ सिव्हिल एव्हिएशन सिक्युरिटी' अर्थात बीसीएएस'कडून तपासणी झाल्यानंतर मे महिन्यात कार्गो टर्मिनल' सुरू होणार आहे. त्यामुळे पुण्यातून देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय मालवाहतुकीला चालना मिळणार असून, 'टर्मिनल'ची वार्षिक साठवणूक क्षमता ३६ हजार




टनांवर जाणार आहे. गेल्या वर्षी जुलैमध्ये महिन्यात हवाई दलाने १.७६ एकर जागा भारतीय 'विमानतळ प्राधिकरणा'ला 'कार्गो टर्मिनल'साठी दिली होती. त्याच जागेवर हे नवीन 'टर्मिनल' उभारण्यात आले आहे. या 'टर्मिनल'चे ९५ टक्के काम पूर्ण झाले असून, सध्या अखेरची काही किरकोळ कामे शिल्लक आहेत. ही कामे पूर्ण झाल्यानंतर 'बीसीएएस'कडून टर्मिनल'ची तपासणी केली जाणार आहे. तपासणीनंतर 'बीसीएएस'ने हिरवा कंदील दाखवल्यानंतर 'टर्मिनल' सुरू करण्यास परवानगी मिळणार आहे.

# ...तर बारसू रिफायनरी प्रकल्प पुढे न्यावा : अजित पवार

सुराज्य/रत्नागिरी

**रत्नागिरीतल्या राजापूर येथील बारसूमधल्या प्रस्तावित रिफायनरीवरून मोठा वाद सुरू आहे. या प्रकल्पाला स्थानिकांनी कडाडून विरोध केला आहे. याविरोधात स्थानिक ग्रामस्थ आंदोलन करत आहेत. तर आतापर्यंत पोलिसांकडून या आंदोलकांविरोधात बळाचा वापर झाल्याचं निदर्शनास आलं आहे. दरम्यान, वेगवेगळ्या राजकीय पक्षांनी या प्रकल्पावर आपापल्या भूमिका मांडल्या आहेत. विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवारांनी देखील याविषयी त्यांची भूमिका गुरुवारी माध्यमांसमोर मांडली.**

अजित पवार म्हणाले की, 'बारसू रिफायनरीप्रश्नी शरद पवार यांनी मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली आहे. तसेच बुधवारी उद्योगमंत्री उदय सामंत यांनी पवार साहेबांची भेट घेतली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची भूमिका स्पष्ट आहे. आमचा पक्ष विकासाआड नाही. परंतु विकास करताना पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही याची काळजी घेतली जावी, आधी लोकांच्या मनातले प्रश्न निकाली काढावे.'



अजित पवार म्हणाले, 'आधी एन्रॉन प्रकल्पालाही असाच विरोध झाला होता. भाजपा शिवसेनेने त्या काळी तो प्रकल्प आणला. त्यानंतर समृद्धी महामार्गालाही विरोध झाला होता. परंतु लोकांना योग्य मोबदला मिळाल्यावर विरोध दूर झाला. त्याप्रमाणे बारसूतील प्रकल्पाकडेही पाहता येईल. परंतु कोकणच्या निसर्ग सौंदर्यावर परिणाम न होता हा प्रकल्प पुढे न्यावा. आधी लोकांच्या मनातले गैरसमज दूर करावे, संवेदनशील मार्ग काढावा, त्यानंतर सरकारने हा प्रकल्प करावा.'

# सहा कोटींच्या नाण्यांसाठी आरबीआय शिर्डीत

सुराज्य/नगर

**शिर्डी साईबाबा संस्थानबरोबरच शिर्डीतील राष्ट्रीयकृत बँकांची डोकेदुखी ठरलेल्या नाण्यांचा प्रश्न अखेर मार्गी लागलाय. भारतीय रिझर्व्ह बँकेचे अधिकारी तसेच शिर्डीतील राष्ट्रीयकृत बँकेचे अधिकारी आणि साईबाबा संस्थानची महत्त्वाची बैठक नुकतीच शिर्डीत पार पडली. यात नाण्यांच्या प्रश्नावर तोडगा निघाला असल्याचे साई संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल जाधव यांनी सांगितले.**

'सबका मालिक एक'चा महामंत्र देणाऱ्या शिर्डी साईबाबांच्या दर्शनासाठी दररोज हजारो भाविक शिर्डीत येतात आणि साईचरणी नतमस्तक होतात. साई दर्शनानंतर भाविक आपआपल्या इच्छेनुसार साईचरणी दान टाकतात. काही भाविक सोने-चांदी अर्पण करतात. तर काही भाविक नोटा आणि नाणी दानपात्रात टाकतात.

गरीबातला गरीब भाविकही येथिल दानपात्रात दान टाकतो. ज्यात नाण्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. हजारो किलोंची नाणी प्रत्येक वेळीच्या मोजदादच्या वेळी संस्थानला प्राप्त होत असते. प्रत्येक मोजदादच्या वेळी जवळपास चार ते पाच लाखांची नाणी दानपात्रात मिळून येतात. वर्षाकाठी सरासरी पाच ते सहा कोटी रुपयांची नाणी येथील दानपात्रात मिळून येतात. वर्षानुवर्षे येथील रोकड स्वीकारणाऱ्या बँकांकडे कोट्यावधी रुपयांची नाणी पडून आहेत. एकतर नाण्याचे वजन आणि दुसरे म्हणजे जागेची कमतरता. त्यामुळे बँकांनी साई




संस्थानच्या कोट्यवधींच्या ठेवींवर पाणी सोडलं होतं. बँकांनी चक्क कॅश काउंटिंगला येण्यास नकार दिला होता.

शिर्डी शहरातील सर्वच राष्ट्रीयीकृत बँकांनी साई संस्थानची रोकड मोजदाद स्वीकारण्यासाठी असमर्थता दर्शवली होती. त्यानंतर साई संस्थानने थेट भारतीय रिझर्व्ह बँकेशीच संपर्क करून यात मार्ग काढण्याची विनंती केली होती. अखेर आरबीआयचे बेलापूर शाखेचे जनरल मॅनेजर मनोज रंजन दास यांनी शिर्डीत येवून साई संस्थान आणि शिर्डीतील तेरा राष्ट्रीयीकृत बँकांसोबत महत्त्वाची बैठक घेतली. संयुक्तरित्या पार पडलेल्या या बैठकीत नाण्यांवर तोडगा निघाला आहे.

ज्या भागात नाण्यांचा तुडवडा आहे, त्या भागात शिर्डीतील राष्ट्रीयीकृत बँकेत पडून असलेली कोट्यवधी रुपयांची नाणी वितरित केली जाणार आहे. यामुळे शिर्डीतील बँकांचा नाण्यांचा बोजा कमी होणार आहे.

जागा रिकामी होणार असल्याने त्या बँकांनी आता साई संस्थानची दान रक्कम स्वीकारण्यासाठी तयारी दर्शवली असल्याचे साई संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल जाधव यांनी सांगितले.

## अवकाळी पावसाने शेतीचे प्रचंड नुकसान

सुराज्य/मराठवाडा

अवकाळी पावसाने राज्यातील शेतक-यांचं प्रचंड नुकसान झाले आहे. गहू, हरभरा, मका पिकाचं नुकसान झालंय...हातातोंडाशी आलेला घास अवकाळीनं हिरावून घेतला...तर गारपिटीमुळे होत्याचं नव्हतं झालं...यामुळे शेतकरी चिंतेत आहे...तसंच शेतमालाला हमीभाव मिळत नाही. कांदा, कोथिंबीर, टॉमेटोला भाव मिळत नसल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेयत. मात्र, शेतकऱ्यांना मदत लवकर मिळावी या मागणीसाठी विरोधक आक्रमक होण्याची शक्यता आहे.

राज्यात अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून नेला आहे. अवकाळी पावसाने राज्यातील शेतकऱ्यांचं प्रचंड नुकसान झाले आहे. गहू, हरभरा, मका पिकाचं नुकसान झाले आहे. केळी पिकाचे मोठे नुकसान झाले असून बागाच्या बागा जमीनदोस्त झाल्यात.

# यापुढे कोणतीही निवडणूक एकतर्फी होऊ देणार नाही : कोकाटे

सुराज्य/टेंभुर्णी

**लोकशाहीत निवडणुका लागतात हे नवीन नाही पण या निवडणुकीने सत्ताधाऱ्यांना झटका बसला आहे. ऊस सोडून कोणतेही पीक लावले गेले नाही पाहिजे अशी व्यवस्था जाणून बुजून निर्माण केली जात आहे. सर्व विरोधी पक्षांच्या सहकार्याने यापुढील कोणतीही निवडणूक बिनविरोध होऊ देणार नाही, असा इशारा शिवसेनेचे माढा लोकसभा संपर्कप्रमुख संजय कोकाटे यांनी दिला.**




माढा तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणूक २०२३ तील सर्वपक्षीय परिवर्तन आघाडीची जाहिर प्रचारार्थ अंतिम सभा टेंभुर्णी येथे साई मंगल कार्यालयात दि. २६ रोजी पार पडली.त्यावेळी ते बोलत होते. प्रा.शिवाजीराव सावंत म्हणाले की, कोट्यावधी रुपयांचा निधी येऊनही तालुक्यात कुठेही चांगले रस्ते नाहीत. पुन्हा सहा महिन्यांनी त्याच ठेकेदारास तेथे खड्डे बुजविण्याचे कॉन्ट्रॅक्ट दिले जाते.यामुळे निकृष्ठ काम करणाऱ्यांना ब्लॅक लिष्ट मध्ये टाकायला लावण्याच्या सूचना दिल्या आहेत. सरकार लोकहिताची कामे करणारे आहे. मार्केट कमिटी निवडणूक ही फक्त सुरुवात आहे. यापुढे सर्व निवडणूका सर्वांना बरोबर व विश्वासात घेऊन लढविणार आहोत. यावेळी रयत क्रांती संघटनेचे संपर्कप्रमुख प्रा.सुहास पाटील म्हणाले की, माढा तालुक्यातील शेतकरी गेल्या दहा वर्षांपासून ऊसाला पर्याय म्हणून केळी आणि द्राक्ष पिकांची लागवड करीत आहे. तीस वर्षे सत्तेवर असताना देखील त्यांना कधी कोल्ड स्टोअरेज बांधण्याचे सुचले नाही. सातत्याने ऊसाभोवती राजकारण फिरले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मालाला चांगला भाव द्यायचा असेल तर मतदारांनी या निवडणूकीत सर्वपक्षीय परिवर्तन आघाडीला साथ द्यावी. या सभेस संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सचिन जगताप, दिनेश जगदाळे, सुधीर महाडिक, शिवाजी पाटील, ज्योती वाघमारे, पोपट अनपट, विनोद पाटील, प्रहार औद्योगिक संघटनेचे अमोल जगदाळे, जयवंत पोळ, गिरीश ताबे, नागनाथ वाघे, सतीश चांदगुडे, रामभाऊ टकले, मुन्ना साठे, वैभव मोरे राहुल चव्हाण, सुभाष इंदलकर आदींसह मतदार उपस्थित होते.





## अक्कलकोटमध्ये गारांचा पाऊस; नारळाच्या झाडावर पडली वीज

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट तालुक्यातील वागदरी, तडवळ, खानापूर, गुड्डेवाडी, म्हैसलगीसह परिसरात विजेच्या कडकडाटासह गुरूवारी सायंकाळी अवकाळी पाऊस पडला. अचानक सायंकाळी अंधारून आले व वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस पडला.

गुड्डेवाडी येथील काशिनाथ विजापुरे यांच्या शेतात नारळाच्या झाडावर वीज पडली. झाडाला वीज पडल्याने आग लागली. तसेच वागदरी, खैराट, किरनळळी, गोगावसह आदी ठिकाणी सुमारे तासभर पाऊस पडल्याने रस्त्यावरून पाणी वाहू लागले.उकाड्याने त्रस्थ झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला. दिवसभर ढगाळ वातावरण होते.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार; चौघांवर गुन्हा

**सोलापूर** : सतरा वर्षीय पीडित मुलीवर अत्याचार करून ती गर्भवती राहिल्यानंतर तिला गर्भ निरोधकाच्या गोळ्या दिल्याप्रकरणी चार जणांवर बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. या बाबत पीडितेच्या आईने फिर्याद दिली आहे. आरोपी मुलाने पीडितेला तुझ्यावर माझे प्रेम आहे,मी तुझ्याशी लग्न करतो असे सांगत पीडितेला लॉजवर नेऊन जात तिच्याशी जबरदस्तीने संबंध ठेवले.ती गर्भवती राहिल्यानंतर तिला दमदाटी देऊन गर्भनिरोधकाच्या गोळ्या खाण्यास भाग पाडले.पीडितेने गोळ्या खाल्यानंतर ते गर्भ पडले.त्यानंतर आरोपीच्या नातेवाईकांनी ही घटना कोणास सांगितल्यास खल्लास करून टाकतो अशी धमकी दिली. तसेच तिला मारहाण केली,अशा आशयाची फिर्याद पीडितेच्या आईने दिली आहे.या फिर्यादीवरून चौघांवर गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा तपास पोलिस करत आहेत.




## महिलेस लज्जा वाटेल असे कृत्य; तरुणावर गुन्हा दाखल

**सोलापूर** : पीडित महिलेच्या घराजवळ जाऊन तिच्या घरासमोर तिच्यानावाने जोर जोरात ओरडत तिच्या ऑफिस मध्ये जाऊन तिला लज्जा वाटेल असे कृत्य केल्याप्रकरणी तरुणावर गुन्हा दाखल झाला आहे.याबाबत पीडितेच्या फिर्यादीवरून प्रमोद गुंड (रा.वसंत विहार) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. आरोपी गुंड हा पीडितेच्या ऑफिसमध्ये जाऊन तेथे त्याने गोंधळ घालत तिला धमकी दिली. शिवाय त्याने पीडितेची गाडी चावी घेऊन जात तुझी चावी व तुझे पैसे विसरून जा असे म्हणत तुझे जगणे मुश्कील करतो अशी धमकी दिली. शिवाय पीडितेला मनाला लज्जा वाटेल असे कृत्य केले.या प्रकरणी आरोपीवर सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा तपास पोलिस करत आहेत.

## टेरेसवर झोपायला गेल्यानंतर चोरट्याने केले घर साफ

सोलापूर (प्रतिनिधी) घराचा मुख्य दरवाजाला कुलूप लावून घराच्या टेरेसवर पती-पत्नी झोपायला गेल्यानंतर चोरट्याने मुख्य दरवाजाचे लोखंडी कुलूप उचकटून घरात प्रवेश करत घरातील लॉकरमध्ये ठेवलेले सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण २५ हजार तीनशे रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे. महानतेश्वर भैरप्पा वाघमारे (वय-३५,रा.महालक्ष्मी नगर,जुना विडी घरकुल) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.त्यांच्या तपास पोलीस नाईक गायकवाड हे करीत आहेत.ही घटना २६ एप्रिल रोजी रात्री दहा ते २७ एप्रिल रोजी पहाटे साडेपाच वाजण्याच्या दरम्यान महालक्ष्मी नगर येथे घडली.

## कामगाराने तीन लाखांची रक्कम पळवली

सोलापूर (प्रतिनिधी) गोविंद मेडिकल येथील कॅशबॉक्स मध्ये असलेली तीन लाख रुपयांची रक्कम महांतेश शिवानंद काटे याने चोरून नेऊन सतीश शिवानंद काटे याला दिली आहे.ही घटना पंधरा दिवसांपूर्वी पासून ते २५ एप्रिल दरम्यान उत्तर मुखी मारुती मंदिराच्या समोर गोविंद मेडिकल येथे घडली.याप्रकरणी सुनील श्रीमंत उगाडे (वय-४५,रा.गॅलेक्सी पनाश अपार्टमेंट) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून काटे या दोघा भावांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास पोसई मुरकुटे हे करीत आहेत.

## महापालिकेने शहरातील ५९३ डिजिटल काढले

**सोलापूर** : शहरात विविध ठिकाणी लावण्यात आलेले ५९३ डिजिटल फलक गुरुवारी महापालिका प्रशासनाने अखेर काढले. संध्याकाळपर्यंत हे डिजिटल काढण्याची मोहीम सुरूच होती.

शहरात अनेक ठिकाणी सण, उत्सावासह वाढदिवसानिमित्त अनेक नेत्यांचे डिजीटल फलक लावण्यात आले होते. याबाबत अनेकांनी महापालिकेकडे तक्रार केली होती. अखेर हे फलक काढण्याची मोहीम महापालिकेने गुरुवारी राबविली. सोलापूर शहरात विविध ठिकाणी विविध १० ठिकाणी नो डिजिटल झोन जाहीर करण्यात आले आहेत. त्या ठिकाणी डिजिटल लावण्यास सक्त मनाई आहे. येथे डिजिटल लावल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी स्पष्ट केले.

## संत रविदास विश्व महापीठ ट्रस्टच्या शहराध्यक्षपदी संगीता जाधव

सुराज्य/सोलापूर

संत रविदास विश्व महापीठ ट्रस्टच्या सोलापूर शहराध्यक्ष पदी मा. नगरसेविका संगीता जाधव यांची नियक्ती करण्यात आली आहे.



संत गुरू रविदास यांनी समतेचा नारा दिला. त्याची विचारधारा ट्रस्टच्या माध्यमातून भारतभर पसरवण्याचे कार्य केले जाते. या ट्रस्टची २२ एप्रिल रोजी शिर्डी येथे ट्रस्टचे उपाध्यक्ष व शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाघचौरे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी संगीता जाधव यांची निवड करून त्यांना नियक्तीपत्र देण्यात आले. यावेळी ट्रस्टच्या राष्ट्रीय महामंत्री सुरेखाताई लांबतुरे, प्रदेश अध्यक्ष वसंतराव धाडवे, राष्ट्रीय प्रवक्ते सूर्यकांत गवळी, सोलापूरचे सामाजिक कार्यकर्ते व दलितमित्र अशोक लांबतुरे, मधुकर गवळी, सौ. अलका लांबतुरे आदींसह ट्रस्टचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते. सौ. संगीता जाधव यांच्या निवडीचे सर्वत्र स्वागत केले जात आहे.

## २९ एप्रिलपासून मल्लिकार्जून देवाची यात्रा

**सोलापूर** : ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन देवाची महायात्रा येत्या २९ एप्रिलपासून सुरू होत आहे. एक मेपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती कमिटीचे अध्यक्ष प्रकाश बिराजदार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

२९ रोजी पहिला अभिषेक तसेच रात्री नऊ वाजता भजनाचा कार्यक्रम होणार आहे. रविवार दिनांक ३० रोजी पहाटे पाच वाजता मल्लिकार्जुन देवास रुद्राभिषेक आणि महापूजा यानंतर नंदीध्वजाची मिरवणूक निघणार आहे. यानंतर प्रसाद वाटप होईल. तेथून मित्र नगर ग्रामदैवत मल्लिकार्जुन मंदिरात आगमन, अक्षता सोहळा, मिरवणूक असे कार्यक्रम होऊन नंदी ध्वजाचे शेळगीत आगमन होईल. याच दिवशी सायंकाळी सात वाजता शेळगी गावठाण येथे ध्वजास नागफणी बांधून मिरवणूक निघेल. रात्री दहा वाजता शोभेचे दारू काम होणार आहे. सोमवार दिनांक १ मे रोजी सकाळी आठ वाजता नंदीध्वजाची मिरवणूक प्रसाद वाटप आणि सायंकाळी पाच वाजता कुस्त्यांचं आयोजन करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेत सुभाष बिराजदार, गंगाधर झुरळे, रेवणसिद्ध कोरे, एलशेट्टी आदी उपस्थित होते.

## लोकमंगलच्या वर्धापन दिनानिमित्त व्याख्यानमाला

**सोलापूर** : सोलापूर लोकमंगल बँकेच्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त बौद्धिक व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. २९ एप्रिल रोजी अभिनेते शरद पोंक्षे हे सावरकर एक उत्तुंग व्यक्तिमत्व या विषयावर बोलणार आहेत. हे व्याख्यान किर्लोस्कर सभागृह हि.ने. वाचनालय येथे सायंकाळी सहा वाजता होणार आहे अशी माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

दिनांक ३० एप्रिल रोजी ह. भ. प. कबीर महाराज यांचे श्री छत्रपती शिवाजी महाराज एक नियोजन रत्न या विषयावर व्याख्यान होणार आहे. लोकमंगल सहकारी बँकेस पंचवीस वर्षे पूर्ण होत आहेत यंदाच्या वर्षी बँकेला चार कोटी ६४ लाख इतका निव्वळ नफा झाला आहे. सभासद ११२८९ असून भाग भांडवल ३३.७६ लाख आहे २३ ६०२ कोटी ८६ लाख असून कर्ज ३७६ कोटी ७५ लाख रुपये इतके आहे बँकेचा पूर्वी सहा टक्के होतात तो यंदाच्या आर्थिक वर्षात दोन टक्क्याने कमी होऊन चार टक्के इतका आला आहे, असेही सांगण्यात आले. या पत्रकार परिषदेस प्रल्हाद कांबळे, अशोक माडगुंडी, देवानंद चिलवंत, अशोक सापडणेकर, कृष्णा वनमराठे, राहुल कोल्हटकर, राहुल कुलकर्णी आदी उपस्थित होते.

## ओमनी गाडी आणि कारचा अपघात; ९ प्रवासी जखमी

**अक्कलकोट ते गाणगापूर रस्त्यावरील अपघात**

**अक्कलकोट** : अक्कलकोट ते गाणगापूर रोडवर मैंदर्गी रस्त्यावर रामपूर शिवारात ओमनी गाडी आणि कारला समोरासमोर धडक होऊन दोन्ही वाहनातील नऊ प्रवासी जख्मी झाले. हर अपघात गुरूवारी दुपारी एक वाजता घडला. यबाबत कारचालक निलेश गाढवे (रा.बनवडी ता. कोरेगांव) यांनी फिर्याद दिली.



गाढवे आपल्या मित्रांची गाडी क्रमांक एच एच.११ सीसी १८३२ घेऊन गाणगापूर येथे दर्शन करून अक्कलकोट कडे येत होते. समोरून गाणगापूरकडे जाणाऱ्या ओमनी गाडीने (क्रमांक एम एच १२ वाय ए ६७३९) त्यांच्या कारला धडक यामध्ये बोलेरो कारमधील फिर्यादी स्वतः तसेच प्रवीण निकम, सचिन निकम, भानुदास निकम हे चार जण जख्मी झाले. त्यातील फिर्यादी गाढवे व प्रवीण निकम गंभीर जख्मी झाले. ओमनी वाहनातून मुंबईचे तीन व अमरावतीचे दोन भाविक प्रवास करत होते. ओमनीतील भक्त अक्कलकोट येथे स्वामी समर्थ दर्शन करून गाणगापूरला देवदर्शनासाठी जात होते. तपास हवालदार रफीक शेख हे करीत आहेत. अपघातामध्ये दोन्ही वाहनांचा चुराडा झाला.

## जुळे सोलापुरातील नाट्यगृहासाठी प्रस्ताव द्यावा

**आ.सुभाष देशमुख यांची आयुक्तांना सूचना**

सुराज्य/सोलापूर

जुळे सोलापुरात गेल्या अनेक वर्षांपासून उच्च शिक्षित व साहित्यिकांची नाट्यगृह सुरू करण्याची मागणी आहे. या नाट्यगृहासाठी महापालिकेने तातडीने प्रस्ताव द्यावा, यासह विविध सूचना आमदार सुभाष देशमुख यांनी पालिका आयुक्त शितल तेली उगले यांना केल्या.



आमदार सुभाष देशमुख यांनी गुरुवारी पालिका आयुक्तांची भेट घेऊन विविध मागण्यांबाबत सविस्तर चर्चा करून आवश्यकता सूचना केल्या. हद्दवाढ भागातील सोरेगाव येथील ड्रेनेजच्या पाण्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत आह. त्याचा ताबडतोब बंदोबस्त करावा, गणेश बिल्डर भाग तीन येथे ड्रेनेजच्या सुविधेचा प्रश्न आह. यावर महिन्यांपासून तोडगा निघालेला नाही. त्यामुळे नागरिक त्रस्त आहेत त्याचाही त्वरित निपटारा करावा, त्याचबरोबर जुळे सोलापूर भागामध्ये चौक सुशोभीकरण करावे, प्रमुख ठिकाणी कारंजा, हिरवळ व वृक्ष लागवड करावी, अ एसआरपी कॅम्प मधील डीपी रोडचा विषयही मार्गी लावण्यासाठी सूचना केल्या. जुळे सोलापूर भागामध्ये नाट्यगृह नाही. त्यामुळे येथे नाट्यगृह करावे अशी अनेक वर्षांपासून मागणी आहे. तरी या नाट्यगृहासाठी जागेचा प्रस्ताव करीत पाठवावा, आपण वरिष्ठ स्तरावर त्याचा पाठपुरावा करू, असेही आ. देशमुख म्हणाले.

**प्रस्ताव लवकरच पाठवू : आयुक्त**

आमदार सुभाष देशमुख यांनी काही सूचना केल्या आहेत. त्याची अंमलबजावणी लवकरच करण्यात येईल. जुळे सोलापुरात एक आरक्षित जागा आहे त्या जागेचा नाट्यगृहासाठी आपण प्रस्ताव लवकरात लवकर पाठवू, असे मनपा आयुक्त शितल तेली उगले यांनी सांगितले.

## ग्रीन बिल योजनेचा लाभ घेतल्यास मिळकतकरात १०० रुपये सवलत

**सोलापूर** : कागद विरहित (पेपरलेस) कामकाज करण्याच्या उद्देशातून महापालिकेकडून मिळकत करासंदर्भात ग्रीन बिल योजना राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ घेणाऱ्यांना शंभर रुपये सवलत मिळणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी दिली.

मिळकतदारांना मिळकत कराचे बिल कागदी स्वरुपात दिले जाते मात्र कागदाचा वापर कमी व्हावा. पेपरलेस व्यवहार व्हावा या उद्देशातून महापालिकेने मिळकत कराचे ऑनलाईन ईमेल द्वारे ग्रीन बिल योजना राबविण्यास सुरुवात केली आहे. ई-मेल द्वारे संबंधित मिळकतदारांना हे ग्रीन बिल पाठविण्यात येणार आहे. त्यासाठी मिळकतदारांनी ग्रीन बिल योजनेत सहभागी होणार असल्याचे कळवावे लागेल. त्यानंतर संबंधितांना ग्रीन विन ईमेल द्वारे पाठविण्यात येणार आहे या योजनेचा लाभ घेणाऱ्यांना शंभर रुपये सवलत देण्यात येत आहे.

**मिळकतदारांना लाभ घेण्याचे आवाहन**

आतापर्यंत ३ हजार मिळकतदारांनी या ग्रीन बिल योजनेचा लाभ घेतला आहे. त्याची संख्या वाढवण्याची गरज आहे. तेव्हा जास्तीत जास्त मिळकतदारांनी ग्रीन बिल योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी केले आहे.


## जिल्हाधिकाऱ्यांचा निराधारांना आधार

### आता तहसील कार्यालयातच मिळणार दाखला

सुराज्य/सोलापूर

संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना हयातीचा व उत्पन्न दाखला आता उत्तर तहसील कार्यालयातच मिळणार असून याबाबत जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी तहसीलदार सैपन नदाफ यांना सूचना दिली आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या या निर्णयामुळे निराधारांना आधार मिळाला आहे. दाखल्यासाठी मारावे लागणारे हेलपाटे आता वाचणार असून एकाच छता खाली दोन्ही दाखले मिळणार आहेत.





संजय गांधी निराधार योजनेतील प्रत्येक लाभार्थ्याला हयातीचा व उत्पन्न दाखला दरवर्षी बंधनकारक करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांची सध्या उत्तर सोलापूर तहसील कार्यालयामध्ये मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. उत्पन्न दाखल्यासाठी उत्तर तहसील ते जुनी फौजदार चावडीजवळील मंडल अधिकारी कार्यालय असे हेलपाटे मारावे लागत होते. याव गरीब वृध्दांचा वेळ व पैसा वाया जात होता. तसेच मंडल अधिकारी कार्यालयात एजंटांचा वावर असल्याने तेथे एजंटाच्या मध्यस्थीशिवाय कामच होत नाही. याचा निराधारांना त्रास होत होता.

ही बाब पत्रकारांनी जिल्हाधिकारी शंभरकर यांच्या निदर्शनास आणून दिली. तेव्हा जिल्हाधिकारी तत्काळ तहसीलदार नदाफ यांना भ्रमणध्वनीवरून सूचना देत मंडल अधिकाऱ्यांना उत्तर तहसील कार्यालयात बसूनच दाखले देण्याची सूचना केली. त्यानुसार आतामंडलाधिकाऱ्यांना दररोज सकाळी ११ ते दुपारी २ पर्यंत उत्तर तहसील कार्यालयात हजर राहावे लागणार आहे. या वेळेत नागरिकांनी दाखले उपलब्ध करून घ्यावेत असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

## तीन ठिकाणी नवीन खरेदी-विक्री नोंदणी कार्यालयाचा प्रस्ताव शासनाकडे

**मंद्रूप, अनगर, टेंभुर्णी येथे सुरू होणार कार्यालये**

सुराज्य/सोलापूर

जिल्ह्यात सध्या १७ खरेदी-विक्री नोंदणी कार्यालये आहेत. त्याअंतर्गत जागा व जमिनींच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार होत आहेत. वाढती लोकसंख्या व वाढते व्यवहार पाहता ही कार्यालये अपुरी पडत असून यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे. या पार्श्वभूमीवर नागरिक आणि लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार नव्याने तीन ठिकाणी खरेदी-विक्री नोंदणी कार्यालये सुरू करण्याचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाने राज्य शासनाला पाठविला आहे.



या प्रस्तावाला लवकरच मंजुरी मिळणार असल्याचे सांगण्यात येते. जिल्हा प्रशासनाच्या प्रस्तावानुसार दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप, मोहोळ तालुक्यातील अनगर आणि माढा तालुक्यातील टेंभुर्णी येथे नवीन खरेदी-विक्री नोंदणी कार्यालये सुरू होणार आहेत.

तीन नवीन कार्यालयाच्या प्रस्तावाबरोबरच पाच कार्यालयाच्या इमारत बांधकामासाठी निधी मंजूर झाला आहे. यापैकी अकलूज येथील खरेदी-विक्री कार्यालयास निधी मिळाला आहे. ज्या कार्यालयांना इमारती नाहीत, त्यांचाही प्रस्ताव सादर केला असून निधी उपलब्ध होताच इमारतीचे काम सुरू करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. खरेदी-विक्रीच्या नवीन कार्यालयांना मंजुरीचे जे निकष आहेत, ते पूर्ण केल्यानंतर मंजुरी देण्यात येईल. यामध्ये महत्वाचा निकष दस्त नोंदणीचा असून त्या त्या ठिकाणचे व्यवहार पाहून नवीन कार्यालयांना मंजुरी दिली जाणार आहे.

**नागरिकांची गैरसोय दूर होण्यास मदत**

२००५ पूर्वी एका तालुक्यात एकच खरेदी-विक्री कार्यालय होते. त्यानंतर वाढते शहरीकरण व जमिनीचे व्यवहार वाढत गेले. दस्त नोंदणीची संख्या पाहून २००५ मध्ये शहराच्या ठिकाणी एकाहून अधिक कार्यालये मंजूर करण्यात आली तर तालुक्याच्या ठिकाणी गरज पाहून दोन कार्यालयांना मंजुरी देण्यात आली. त्यानुसार सोलापूर शहरासाठी दोन कार्यालये, बार्शी, पंढरपूर याठिकाणी दोन कार्यालयास मंजुरी देण्यात आली. माळशिरस तालुक्यात अकलूज येथेही कार्यालय मंजूर करण्यात आले आहे. नवीन कार्यालये मंजूर झाल्यानंतर नागरिकांची गैरसोय दूर होण्यास काही अंशी मदत होणार आहे.